मुंबई विद्यापीठ

UNIVERSITY OF MUMBAI

'नॅक' पुनर्मुल्यांकित – 'अ' श्रेणी

***Re-ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC***

दिनांक २० व २१ मार्च, २०१४ रोजी
झालेल्या अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त.

•

**Minutes of the Annual Meeting
of the Senate held on
20th & 21st March, 2014.**

# मुंबई विद्यापीठ

‘नॅक’ पुनर्मुल्यांकित – ‘अ’ श्रेणी

दिनांक २० व २१ मार्च, २०१४ रोजी
झालेल्या अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त.

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र. २-२०१३-२०१४

अधिसभा
२० व २१ मार्च, २०१४

अधिसभेची वार्षिक सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षांत सभागृह), येथे गुरूवार दिनांक २० मार्च, २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली आणि ही सभा शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरू झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते -

| | | २० मार्च | २१ मार्च |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू) | LOA | LOA |
| २. | डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू) | P | P |
| ३. | प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे | P | P |
| ४. | डॉ. मृदुळ जगन्नाथ निळे | P | P |
| ५. | श्री. भुजंग किसनराव अहिरे | P | P |
| ६. | डॉ. दिलीप शंकरराव पाटील | P | P |
| ७. | प्राचार्य रविंद्रन कर्थाडी | P | P |
| ८. | प्राचार्या (श्रीमती) मंजुळा जेठानंद निचाणी | P | P |
| ९. | प्राचार्य (डॉ.) गोरक्ष विठ्ठल पारगांवकर | P | P |
| १०. | प्राचार्य मारोती तुळशिराम भगत | P | P |
| ११. | प्राचार्य (डॉ.) विष्णू नंदा मगरे | P | P |
| १२. | प्राचार्य (डॉ.) मुरलीधर एस. कु-हाडे | P | P |
| १३. | प्राचार्य दिलीप गंभीर बोरसे | P | P |
| १४. | प्राचार्या (श्रीमती) ॲन्सी जोस | P | P |
| १५. | प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील | P | P |
| १६. | प्राचार्या (श्रीमती) चैताली तापस चक्रवर्ती | P | P |
| १७. | प्राचार्य (डॉ.) कृष्णा अप्पया पाटील | P | P |
| १८. | प्राचार्य विठ्ठल बळीराम रोकडे | P | P |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम् | P | P |
| २०. | प्राचार्य सुधीर रामचंद्र भोसले | P | P |
| २१. | प्राचार्या (श्रीमती) हर्षा कमलेश मेहता | P | A |
| २२. | प्राचार्या (श्रीमती) प्रमिला श्रीकांत राऊत | P | P |
| २३. | प्राचार्य (डॉ.) सिद्धेश्वर तुकाराम गडदे | P | P |
| २४. | श्री. झहीर इशाक काझी | P | P |
| २५. | श्री. हसमुख देवजी रांभीया | P | P |
| २६. | श्री. महेश काशिनाथ म्हात्रे | P | P |
| २७. | श्री. वसंतरावजी गणेशमल ओस्वाल | P | A |
| २८. | श्री. संजय बाबुराव शेटे | P | P |
| २९. | श्रीमती कवल अजय वर्मा | P | A |
| ३०. | श्री. भिकू रामजी इदाते | P | A |
| ३१. | कु. रेश्मा चंद्रकांत पाटील | P | P |
| ३२. | श्री. पियुष महादेव झेंडे | P | P |
| ३३. | डॉ. एम.ए.खान (सचिव) | P | P |
| ३४. | डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम | P | P |
| ३५. | डॉ. जालिंदर अडसुळे | P | A |
| ३६. | डॉ. आद्याप्रसाद पांडये | P | P |
| ३७. | डॉ. शितलाप्रसाद दुबे | P | P |
| ३८. | डॉ. (श्रीमती) मधू सुधीर परांजपे | P | P |
| ३९. | डॉ.(श्रीमती) संगिता अतुल गोडबोले | P | P |
| ४०. | डॉ. बिंदूप्रकाश बेचन मिश्रा | P | P |
| ४१. | डॉ. संजय कुमार | P | P |
| ४२. | डॉ. (श्रीमती) अनुराधा संदिप मझुमदार | P | P |
| ४३. | डॉ. विवेक बळवंतराव देशमुख | P | P |
| ४४. | डॉ. अभय नामदेवराव बांबोले | P | P |
| ४५. | डॉ. (श्रीमती) सुनिता दशरथ खारीवाल | P | P |
| ४६. | डॉ. प्रल्हाद गंगाराम पवार | P | P |

| | | | |
|---|---|---|---|
| ४७. | डॉ. दिपक गंगाधरराव बीडवई | P | P |
| ४८. | डॉ. (श्रीमती) माधवी सुधीर निकम | P | P |
| ४९. | डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद | P | P |
| ५०. | डॉ. (श्रीमती) अनुपमा जयवंत सावंत | P | P |
| ५१. | डॉ. वसंत सिताराम शेकडे | P | P |
| ५२. | डॉ. विजय नामदेव पवार | P | P |
| ५३. | श्री. महादेव बाबुराव जगताप | P | P |
| ५४. | श्री. प्रदीप बाळकृष्ण सांवत | P | P |
| ५५. | श्री. सुधाकर शंकर तांबोळी | P | P |
| ५६. | श्री. गणेश सदाशिव चव्हाण | P | P |
| ५७. | श्रीमती निलीमा नंदकुमार भुर्के | P | P |
| ५८. | श्री. संजय तुळशीराम वैराळ | P | P |
| ५९. | श्री. तुषार व्यंकटराव कुमारे | P | A |
| ६०. | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | P | P |
| ६१. | श्री. राजन वसंत कोळंबेकर | P | P |
| ६२. | प्राचार्य मुरलीधर गोविंदराव चांदेकर | P | A |
| ६३. | प्रा. अंबादास येलोजी मोहिते | P | A |
| ६४. | श्री. प्रकाश विठ्ठल पागे | P | A |
| ६५. | डॉ. राजन मोरेश्वर तुंगारे | P | A |
| ६६. | डॉ. उदय साळुंखे | P | P |
| ६७. | डॉ. (श्रीमती) कविता रामचंद्र लघाटे | P | P |
| ६८. | डॉ. प्रल्हाद गंगाराम जोगदंड | P | P |
| ६९. | डॉ. (श्रीमती) माधुरी किरण पेजावर | P | P |
| ७०. | डॉ. सुरेश किसनराव उकरंडे | P | P |
| ७१. | डॉ. टी. पी. मधू नायर | P | P |
| ७२. | श्री. दिलीप दगडू पवार | P | P |
| ७३. | डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले | P | P |
| ७४. | डॉ. गंगाधर आसाराम मेश्राम | P | P |

| | | | |
|---|---|---|---|
| ७५. | डॉ. (श्रीमती) सुनिता विठ्ठलराव मगरे | P | P |
| ७६ | डॉ. (श्रीमती) शेफाली रसेंद्रा पंड्या | P | P |
| ७७. | डॉ. रामभाऊ महादू बडोदे | P | P |

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरूवात करताना मा. प्र-कुलगुरूंनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले. तसेच मा. कुलगुरूंना अत्यंत खाजगी कामासाठी रजा घ्यावी लागली असल्याची माहिती सभागृहाला दिली. तसेच संपूर्ण देशामध्ये लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यामूळे आचारसंहिता लागू झाली आहे. सदर बैठक अर्थसंकल्प पारीत करण्यासाठी असून आचारसंहितेचा भंग होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेतली पाहिजे.

अधिसभेच्या नवीन सदस्यांचे मुंबई विद्यापीठाच्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(एन्) नुसार विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी कुमारी रेश्मा चंद्रकात पाटील व सचिवपदी कुमार पियुष महादेव झेंडे यांची नेमणूक झाल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यानंतर डॉ. (श्रीमती) एम. एस. मोलवणे, डॉ. रूपा शहा आणि डॉ. (श्रीमती) शुभदा जोशी, या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य करण्यात आली.

त्यानंतर सभागृहाने श्री. गो. पु. देशपांडे, डॉ. श्रीधर शनवारे, डॉ. विक्रम मारवाह, श्रीमती तरला दलाल, डॉ. ज्योती लांजेवार, श्री. दिलीप करंडे, श्री. सुधीर भट, डॉ. नेल्सन मंडेला, श्री. विनय आपटे, श्री. फारूख शेख, डॉ. आर कृष्णकुमार, प्रा. ज्योतिका ओझरकर, प्राचार्य (डॉ.) पी. बी. पाटील, चित्रकार श्रीमती प्रफुल्ला डहाणूकर, श्री. आनंद बाळाजी देशपांडे, श्री. सुधीर मोघे श्री. नामदेव ढसाळ, प्राचार्य दिनेश सिंह पाटील, श्री. अमुल सरपोतदार तसेच गारपीटग्रस्त शेतकरी व मागील अधिसभा ते आजपर्यंतच्या कालावधीत मुंबई विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्ये दु:खद निधन झाले त्यांच्या दु:खद निधनाबदद्ल शोक व्यक्त करून दोन मिनिटे मौन धारण करून श्रद्धांजली वाहिली.

अधिसभेच्या अधिकृत कार्यक्रमपत्रिकेवर विचार करण्यापुर्वी पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे, संस्थाचे अभिनंदन करण्यात आले.

➢ मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेचे माजी संचालक, प्रो. जे. बी. जोशी यांना प्रजासत्ताक दिनी पद्मभूषण बहाल करून सन्मानीत करण्यात आले.

➢ मुंबई विद्यापीठाच्या सेंटर फॉर बेसिक सायन्सेसचे संचालक डॉ.रामकृष्ण व्ही. हौसूर यांना प्रजासत्ताक दिनी पद्मश्री बहाल करून सन्मानीत करण्यात आले.

➢ अकॅडमी ऑफ थिएटर आर्टस्चे माजी संचालक सुप्रसिध्द नाटय दिग्दर्शक व प्रशिक्षक प्रा. वामन केंद्रे यांची नवी दिल्लीच्या एन.एस.डी., संचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

➢ 'इंदिरा गांधी राष्ट्रीय सेवा योजना' प्रशंसा पुरस्कार २०१३ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमातील योगदानाबद्दल उत्कृष्ट समन्वयक कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. अतुल सांळुखे व स्वयंसेवक म्हणून कांदिवली येथील ठाकूर महाविद्यालयाची विद्यार्थीनी साक्षी कोमल शर्मा यांना राष्ट्रपती भवनात मा. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

➢ टाटा केमिकल्स लिमिटेड, असोसिएशन ऑफ केमिस्ट्री टीचर्स, रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री आणि गोदरेज यांच्या सहकार्यातून देण्यात येणारा राष्ट्रीय स्तरावरील यावर्षीचा बेस्ट केमिस्ट्री टीचरचा पुरस्कार रूईया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पेडणेकर यांना प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्या ॲकॅडमी ऑफ थिएटर्स आर्टसच्या संचालकपदी मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ नाटककार श्री. शफाअत खान यांची निवड करण्यात आली.

➢ प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथील राजपथावर होणा-या संचलनात राज्यातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. देशातील एकूण १४० एन.एस.एस स्वयंसेवकांचे नेतृत्व महाराष्ट्राच्या बीड येथील बलभीम महाविद्यालयातील विद्यार्थी सोपान मुंडे आणि दुस-या फळीचे नेतृत्व मुंबईच्या खालसा महाविद्यालयाची विद्यार्थींनी वर्षा ठोंबरे यांनी केले.

➢ मुंबई विद्यापीठातर्फे यावर्षीपासून पहिल्यांदाच सर्वोत्कृष्ट विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांची निवड केली जाणार आहे. यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयाकडून नॉमिनेशन्स मागवली आहेत. यासाठी एक नियमावली आखून विद्यापीठस्तरावर एका समितीची स्थापना करण्यात येणार आहे. याबाबतचे परिपत्रक सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे.

➢ मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठात संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकवण्यात यश मिळविले आहे. या स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांची थेट निवड कुरूक्षेत्र विद्यापीठात होणा-या सरस्वती युवा महोत्सवासाठी करण्यात आली आहे.

➢ चंदीगढ येथे संपन्न झालेल्या १३ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने पुरूष गटात तिसरे स्थान मिळविले. तसेच सर्वसाधारण विजेतेपदही मुंबई विद्यापीठाने महिला व पुरूष अशा दोन्ही गटात तिसरे स्थान मिळविले.

➢ अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय स्क्वॅश (पुरूष) स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने अव्वल स्थान पटकावले आहे. मुंबई विद्यापीठाच्या यजमानपदाखाली अखिल भारतीय स्क्वॅश (पुरूष) स्पर्धेचे आयोजन दिनांक २० ते २२ जानेवारी, २०१४ दरम्यान बॉम्बे जिमखाना स्क्वॅश कोर्टवर संपन्न झाली. यास्पर्धेचे उद्घाटन श्री. चारू शर्मा, प्रसिध्द क्रिकेट समालोचक यांच्या हस्ते झाले तर समारोप एच. आर. महाविद्यालयाच्या उप-प्राचार्या श्रीमती रेखा बहादुर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. तसेच स्पर्धेमध्ये एकूण २२ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता.

➢ आरोग्य विद्यापीठाने आयोजित केलेल्या आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

➢ लोणेरे येथे पार पडलेल्या ११ व्या इंद्रधनुष्य युवा महोत्सव स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने सलग अकराव्यांदा विजेतेपद पटकावण्यात यश मिळविले आहे.

➢ आंतरविद्यापीठ राज्यस्तरीय 'अविष्कार' स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाने अजिंक्यपद पटकावले. राज्यातील एकूण १९ विद्यापीठांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामध्ये मुंबई विद्यापीठाने १० सुवर्णपदके आणि ७ रौप्यपदके मिळवीत वर्चस्व राखले.

➢ विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन मिळावे म्हणून मा. कुलगुरूंनी 'समर स्कुल' ची घोषणा केली आहे.

➢ मांटुगा येथील रूईया महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'कॉलेज ऑफ एक्सलन्स' हा बहुमान देण्यात आला आहे. हा बहुमान मिळविणारे हे देशातील पहिले महाविद्यालय आहे. रूईया महाविद्यालयाच्या भविष्यातील विकासासाठीही आयोगातर्फे दोन कोटी रूपयांचे अनुदान देण्यात आले आहे.

➢राष्ट्रीय मुल्याकंन आणि प्रत्यायन परिषदे (नॅक) तर्फे देशभरातील महाविद्यालयांची नॅक ग्रेडची यादी जाहीर करण्यात आली. या यादीत बिर्ला महाविद्यालयाने यंदा ४ पैकी ३.५८ गुण तसेच विलेपार्लेच्या एम.एल. डहाणूकर महाविद्यालयाने ३.०१ गुण मिळवून 'ए' ग्रेड मिळवत हॅटट्रिक साधली. महाराष्ट्रात मुंबई विद्यापीठातील सर्वाधिक महाविद्यालयांनी 'ए' ग्रेड मिळविण्यात यश मिळविले आहे.

➢मुंबई विद्यापीठ व ॲग्लीया रस्किन विद्यापीठ युके यांच्यात शैक्षणिक करार करण्यात आला असून या कराराअंतर्गत मुंबई विद्यापीठात म्युझिक थेरेपीचा कोर्स लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

➢ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणा-या मुंबई विद्यापीठाच्या 'ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स' विभागाने दशकपुर्तीनिमित्ताने दिनांक २४ ते २७ मार्च, २०१४ रोजी राष्ट्रीय नाटय विद्यालय, नवी दिल्ली आणि राज्य शासनाच्या सहकार्याने 'राष्ट्रीय महारंग परिषद' विद्यानगरी परिसरात आयोजित केली जाणार आहे. या समारंभामध्ये भारतभरातून ख्यातनाम रंगकर्मी उपस्थित राहणार आहेत.

➢शतकपुर्ती झालेल्या १०२ व्या इंडियन सायन्स कॉंग्रेसचे २०१५ सालचे यजमानपद तब्बल ४५ वर्षांनंतर मुंबई विद्यापीठाला मिळाले आहे. मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरामध्ये दिनांक ३ ते ७ जानेवारी, २०१५ रोजी आयोजित करण्यात येणार असून 'सायन्स एण्ड टेक्नॉलॉजी फॉर ह्यूमन डेव्हलपमेंट' यावेळच्या सायन्स कॉंग्रेसची थीम आहे. देश विदेशातील विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुमारे १० हजाराहून अधिक वैज्ञानिक आणि नोबेल लॉरेटस या सायन्स कॉंग्रेसमध्ये सहभागी होणार आहेत. यानिमित्ताने देश विदेशातील वैज्ञानिकांशी विद्यार्थ्यांना थेट संवाद साधण्याचे मोठे व्यासपीठ मुंबई विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणार आहे. मुंबई विद्यापीठात आयोजित होणा-या सायन्स कॉंग्रेसचे यजमानपद मा. कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांना बहाल करण्यात आले आहे. तसेच मा. प्र.कुलगुरू (डॉ.) नरेश चंद्र व महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे हे स्थानिक सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

विद्यापीठातील कर्मचा-यांच्या दोन्ही क्रिकेट संघांनी स्पर्धेत चांगली कामगिरी केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव सन्मानीय सदस्य श्री महादेव जगताप

यांनी मांडला व त्यास सन्माननीय सदस्य श्री संजय वैराळ यांनी अनुमोदन दिले तसेच सभागृहाने दोन्ही संघाचे अभिनंदन केले.

यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रमपत्रिकेवरील बाब क्र. १ अधिसभेपुढे मंजूरीसाठी मांडली.

**बाब क्र. १ : दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

कार्यक्रम पत्रिकेवरील हा विषय सभेपुढे आला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. सभेपुढे इतिवृत्त म्हणून जे देण्यात आले आहे. त्यात अनेक त्रुटी आहेत. सभासदांनी पोटतिडकीने मांडलेले मुद्दे त्यांत आलेले नाहीत. इतिवृत्त हे सभासदांनी विद्यापीठाच्या कामकाजात केलेल्या सहकार्याची पावती असते. सभासदांनी मांडलेला मुद्दा व त्याअनुषंगाने त्याचर्चेत सहभागी झालेल्या इतर सदस्यांच्या नावाचा उल्लेख करणेही तितकेच महत्वाचे आहे. आदी आक्षेप सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप, श्री. संजय वैराळ, श्री. राजन कोळबेंकर, प्राचार्य मुरलीधर कु-हाडे, श्री. सुधाकर तांबोळी, श्रीमती निलीमा भुर्के, डॉ. विजय पवार, श्री. प्रदिप सांवत, श्रीमती (डॉ.) मधू परांजपे, श्री. शशिकांत झोरे, प्रा. बिंदूप्रकाश मिश्रा, डॉ. मोहसिना मुकादम यांनी नोंदविले.

सन्माननीय सदस्यांनी सभागृहात पोटतिडकीने मांडलेले ठळक मुद्दे व त्यावर झालेली चर्चा, चर्चेत सहभागी झालेल्या सदस्यांची नावे आणि त्यावरील ठराव/आश्वासने इत्यादी महत्वाच्या बाबी इतिवृत्तात काळजीपूर्वक घेण्यात आल्या असल्याबद्दल खुलासा इतिवृत्त तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीचे सदस्य म्हणून सन्माननीय सदस्य प्रा. अंबादास मोहीते यांनी केला.

सभासदांना सभागृहाच्या कामकाजाची सी.डी. देण्यात येते. परंतु इतिवृत्त हे संक्षिप्त असावे, त्यात सर्व महत्वाच्या मुद्दयांचा अंतर्भाव असावा अशी सूचना सन्माननीय सदस्य प्राचार्य मुरलीधर चांदेकर यांनी केली.

सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता कामकाजातील महत्वाचे मुद्दे त्यावरील ठराव/आश्वासने व चर्चेत सहभागी झालेल्या सदस्यांची नावे काळजीपूर्वक इतिवृत्तात येतील असे आश्वासन मा. प्र-कुलगुरूंनी दिले असता सभागृहाने सर्वानुमते इतिवृत्त मंजूर केले.

लोकसभा निवडणूकांच्या निकालाच्या दिवशी दिनांक १६ मे, २०१४ रोजी होणा-या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात याबाबतचा मुद्दा श्री. प्रदीप सावंत यांनी सभागृहात लावून धरला त्याचप्रमाणे बॅचलर ऑफ फायनान्स ॲण्ड अकाऊंटींग या विषयाचे निकाल अद्याप का लागले नाहीत याबाबत सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी विचारणा केली असता सदर परीक्षेचा निकाल कालच लागलेला असून १६ मे, २०१४ ची परीक्षा पुढे ढकलण्यात येईल. असे आश्वासन मा. प्र-कुलगुरूंनी दिले.

परीक्षेचे निकाल उशीरा लागण्याची एक महत्वाची बाब म्हणजे एम.के.सी. एल. हे देखिल आहे. एम.के.सी.एल. सोबत विद्यापीठाने केलेला करार हा सन २००६ साली झालेला आहे तथापी आजपर्यंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आणि परीक्षेच्या चेअरपर्सनला एम.के.सी.एल.बाबत फार वाईट अनुभव आलेला आहे. तंत्रज्ञानाचा अवलंब करताना तो सोप्या पध्दतीने केला पाहिजे जेणेकरून विद्यापीठ, विद्यार्थ्यांना आणि प्राचार्यांना त्याचा त्रास होणार नाही व त्याचा परिणाम निकालावर होणार नाही असे पहावे अशाप्रकारची सूचना सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे यांनी केली.

सन २००९ मध्ये डिग्री सर्टिफिकेट घरपोच देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले एकूण रूपये एक लाख दहा हजार विद्यार्थ्यांना व्याजासह परत करण्याची मागणी सन्मानीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी पुन्हा एकदा केली असता डिग्री सर्टिफिकेटसाठी घेण्यात आलेल पैसे एका महिन्यात परत करण्यात येईल असे आश्वासन कुलसचिवांनी दिले.

क्रेडीटबेस्ड नुसार ६०:४० गुण पध्दती पूर्णपणे कोसळली असून त्याबाबत पुन्हा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. स्केलिंग डाऊन मध्ये विसंगती आहे. कला व वाणिज्यसाठी वेगळी पध्दत आणि विज्ञान मधील फिजीक्स, केमिस्ट्री, मॅथ्स यासाठी वेगळी पध्दत. स्केलिंग डाऊन पध्दतीला प्राध्यापक विद्यार्थी वर्गाकडून विरोध होत आहे. त्याचप्रमाणे नवीन परीक्षा पध्दतीमुळे परीक्षा विभागावर पडणार ताण, कर्मचारी वर्गावर वाढलेल्या कामाचा बोजा या सगळया गोष्टीचा विचार करता ही पध्दत लवकर बंद करावी याबाबत झालेल्या चर्चेत डॉ. (श्रीमती) मधू परांजपे, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम, डॉ. वसंत शेकडे, श्री. सुधाकर तांबोळी या सन्मानीय सदस्यांनी सहभाग घेतला. तसेच कला, वाणिज्य आणि विज्ञान यामध्ये जर काही विसंगती असेल तर त्याबाबत उपस्थित अधिष्ठातांनी याबाबत खुलासा करावा अशी मागणी प्राचार्य मुरलीधर कु-हाडे यांनी केली.

तीन वर्षापूर्वी आपण सेमिस्टर बेस्ड् ग्रेडिंग पध्दती स्विकारली असून, सदर पध्दतीचे हे तिसरे वर्ष आहे. या पध्दतीबाबत पुन्हा विचार करण्यासाठी रिव्हू कमिटी गठीत करण्यात आली आहे आणि शेवटच्या बैठकीत ७५/२५ गुण पध्दतीबाबत शिफारस करण्यात आली असून रिव्हू कमिटी फक्त शिफारस करू शकते. सदर शिफारस लवकरच मान्यतेसाठी विद्वत परिषदेपुढे ठेवण्यात येणार असल्याचा खुलासा अधिष्ठाता प्राचार्य (डॉ.) मधू नायर, यांनी केला.

यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रमपत्रिकेवरील बाब क्र. २ अधिसभेपुढे मंजूरीसाठी मांडली.

**बाब क्र. २ प्रश्नोत्तराचा तास**

प्रश्न क्रमांक १ च्या अनुषंगाने प्राचार्य (डॉ.) सिध्देश्वर गडदे यांनी विद्यापीठाचे सर कावसजी जहांगिर सभागृह वातानुकुलित करण्याचे ठरविले आहे का? असल्यास कधी पर्यंत पूर्ण होईल असा प्रश्न उपस्थित केला.

सर कावसजी जहांगीर सभागृह वातानुकुलित करण्याचे विद्यापीठाने ठरविले असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. अशी माहिती प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी दिली.

राजाबाई टॉवर व सर कावसजी जहांगीर सभागृह याबाबत सभागृहाला अधिकची माहिती दयावी. तसेच वातानुकुलित करण्यासाठी कोणी देणगी दिली त्याबद्दल माहिती दयावी. अशी मागणी सन्मानीय सदस्य प्राचार्य (डॉ.) सुधीर भोसले यांनी केली. प्रश्नोत्तराच्या तासाची मर्यादा लक्षात घेता इतर महत्वाच्या प्रश्नांनाही वेळ मिळाला पाहिजे, राजाबाई टॉवर व सर कावसजी जहांगीर सभागृहाबाबत छापील माहिती सभासदांना प्राप्त झाली असून प्रशासनाने ती वाचण्यात वेळ घालवू नये अशी सूचना श्रीमती निलिमा भुर्के, श्री. सुधाकर तांबोळी, श्री. राजन कोळंबेकर, डॉ. वसंत शेकडे, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम आणि प्रा. अंबादास मोहिते यांनी केली असता, सभासदांच्या भावना लक्षात घेऊन प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी सभागृहास राजाबाई टॉवर व सर कावसजी जहांगीर सभागृहाबाबत अतिशय महत्वाची माहिती थोडक्यात दिली, तसेच सभागृह वातानुकुलित करण्यासाठी कुलगुरूंनी पुढाकार घेतल्यामुळे हे होऊ शकल्याबद्दलची माहिती दिली.

प्रश्न क्र. २ – विद्यापीठाच्या कल्याण उपकेंद्राच्या बांधकामाबाबत विद्यापीठाचे काय नियोजन आहे, असा प्रश्न प्राचार्य मारोती भगत यांनी उपस्थित केला.

राजाबाई टॉवर मधील संशोधन करणा-या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या खोलीचे रूपांतर म्युझियममध्ये करण्याचे विचाराधीन आहे का? याबाबतची विचारणा सन्माननीय सदस्या डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम यांनी केली असता, प्रशासनाने याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही, असा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी सभागृहास केला.

कल्याण उपकेंद्रासाठी उपलब्ध झालेल्या एकुण १० एकर जागेपैकी विद्यापीठाच्या ताब्यात ६.२६ एकर इतकी जागा आहे. बाकीची जागा मिळविण्यासाठी विद्यापीठ प्रशासन काय प्रयत्न करत आहे. तसेच कल्याण उपकेंद्रात सुरू होणारे स्कुल ऑफ इंजिनीअरिंग हे टाटा आणि व्हीजेटीआय सारख्या संस्थेच्या दर्जाचे करण्यासाठी विद्यापीठाने दानशूर व्यक्तीकडून देणगी मिळवली पाहिजे असे सन्माननीय सदस्य श्री.महादेव जगताप आणि श्री. सुधाकर तांबोळी यांनी सुचविले.

कल्याण उपकेंद्रात स्कुल ऑफ इंजिनिअरिंग सोबत स्कुल ऑफ फार्मासिटीकल टेक्नॉलॉजी ॲन्ड सायन्स देखील सुरू करावे अशी सूचना सन्माननीय सदस्य डॉ. श्रीमती सुनिता खारीवाल आणि डॉ. विवेक देशमुख यांनी केली.

प्रश्नोत्तराच्या तासांतर्गत इंजिनिअरिंग महाविद्यालया संदर्भात विचारण्यात आलेल्या माहिती ७० महाविद्यालयांपैकी फक्त १४ महाविद्यालयांची अर्धवट माहिती प्राप्त झाली आहे. याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. श्रीमती अनुपमा सावंत यांनी नाराजी व्यक्त केली.

कल्याण उपकेंद्रात सुरू होणा-या स्कुल ऑफ इंजिनिअरींगबाबत विद्यापीठाचे अभिनंदन करत सन्मानीय सदस्य प्राचार्य (डॉ) विष्णू मगरे यांनी कल्याण उपकेद्रांत सुरू होणा-या स्कुल ऑफ इंजिनिअरिंग बाबत जनतेत संभ्रम आहे त्याचे निराकरण व्हावे. विद्यापीठाने या स्कुलबाबत नेमके काय ध्येय/धोरण अवलंबले आहे. तसेच त्याबाबत काय कार्यवाही केली आहे याबाबत सभागृहाला थोडक्यात अवगत करण्याची विनंती केली आहे.

विद्यापीठाच्या कलिना परीसरातील इमारतींच्या बांधकामाबाबत आलेल्या अनुभवाचा विचार करता. कल्याण उपकेंद्रासाठी इमारतीचे बांधकाम करताना तेथील इन्फ्रासट्रक्चर, मुलांसाठी वसतिगृह, भविष्यात तेथे चालविण्यात येणारे कोर्सेस अशा सगळया गोष्टींचा विचार करून इमारतीचे बांधकाम करणे गरजेचे आहे. तसेच तेथील कंपाउंड पुढील ५० वर्षात त्याला काहीही होणार नाही इतके भक्कम असले पाहिजे अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. संजय शेटे यांनी केली.

मुंबई विद्यापीठाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेबरोबर कल्याण उपकेंद्राच्या बांधकामाबाबत करार केला. जागा हस्तांतरण केल्यानंतर, कराराप्रमाणे विद्यापीठाने सर्व प्रक्रिया पूर्ण करून स्कूल ऑफ इंजिनिअरींग सायन्सेस इमारतीचे नकाशे तयार करण्यासाठी वास्तुविशारदांची दिनांक २१ एप्रिल, २०१२ रोजी नेमणूक केली. त्याअनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे आराखडे मान्यतेसाठी दिनांक २९ जुलै, २०१३ रोजी सादर करण्यात आले. आराखडयांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून दिनांक २५ जानेवारी, २०१४ रोजी मान्यता देण्यात आली. दिनांक ४ मार्च, २०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीत वास्तुविशारदाकडून तयार केलेल्या इमारतीच्या बांधकाम खर्चाच्या अंदाज पत्रकास मान्यता मिळाली आहे. ठेकेदाराकडून निविदा मागविण्यासाठी दिनांक ६ मार्च, २०१४ रोजीच्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसारीत केली असून पुढील प्रक्रिया सुरू आहे असा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

स्कुल ऑफ टेक्नॉलॉजी, स्कुल ऑफ बेसीक सायन्स, बी.टेक., एम.टेक. अशा प्रकारचे विविध अभ्यासक्रम ठाणे उपकेंद्रात सुरू करणार असून कल्याण उपकेंद्रात आय.आय.टी. पॅर्टन प्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहे. सदर उपक्रमासाठी मोठया देणग्यांची आवश्यकता आहे त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे असे मा. प्र-कुलगुरू यांनी आवाहन केले.

प्रश्न क्र. २ च्या अनुषंगाने प्राचार्य मारोती भगत यांनी विद्यापीठाने कलिना कॅम्पस फिरोजशहा मेहता भवन येथे निर्माण केलेल्या व्हर्च्युअल क्लास रूमचा (विश्व आभासी वर्ग) विद्यापीठातील विभागांना कधी उपयोग करावयाचा असल्यास त्याकरीता विद्यापीठ प्रशासनाने एक लक्ष रूपये भाडे आकारण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय? हे खरे नसल्यास या संदर्भात अर्थशास्त्र विभागाच्या विभागप्रमुखांनी आयबीएन लोकमतवरील आजचा सवाल कार्यक्रमात विद्यापीठ प्रशासनाबाबत केलेले आरोप व उलटसुलट केलेली विधाने यामुळे विद्यापीठाची नाहक बदनामी व प्रतिमा मलिन झाली त्याबाबत विद्यापीठाने काय कारवाई केली? अशी पृच्छा केली.

फिरोजशहा मेहता भवन हि इमारत एका संस्थेने बांधून दिलेली आहे. म्हणून त्या संस्थेने केलेल्या कराराप्रमाणे काही वर्षानंतर आभासी वर्ग आपल्याला तेथून इतर ठिकाणी हलवावा लागेल का? याबाबत सभागृहाला माहिती देण्याची विनंती सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी केली.

आभासी वर्गाबाबत निर्माण झालेला गैरसमज व वाढलेला गोंधळ लक्षात घेता. विद्यापीठामार्फत आभासी वर्गासाठी आकारण्यात येणा-या फी संबधी

विद्यापीठाने काहीतरी परिपत्रक काढावे असे सन्मानीय सदस्य प्राचार्य (डॉ.)सिध्देश्वर गडदे यांनी सुचविले.

जमनालाल बजाज व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी दर शनिवारी जवळपास पंधरा आठवडे आभासी वर्गाचा वर्कशॉपच्या माध्यमातून अनुभव घेतला व सदर घेण्यात आलेल्या वर्कशॉपसाठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेली फी जवळपास चाळीस हजार रूपये जमा झाली व त्यापैकी खर्च वगळता जवळपास वीस हजार रूपये विद्यापीठाला देण्याचे ठरविले आहे. अशाप्रकारचा आभासी वर्गाबाबत आलेला अनुभव सन्माननीय सदस्या डॉ. कविता लघाटे यांनी सभागृहास सांगितला.

विद्यापीठाने व्हर्च्युअल क्लास संदर्भात कोणत्याही प्रकारचे परिपत्रक काढलेले नाही तसेच विद्यापीठाकडून एक लाख रूपये व्हर्च्युअल क्लाससाठी आकारण्यात येतात अशी वृत्तवाहिनीवर दिलेली माहितीही खोटी आहे. आतापर्यंत कोणत्याही कार्यक्रमासाठी विद्यापीठ प्रशासनाने व्हर्च्युअल क्लास रूम साठी एक लाख रूपये घेतलेले नाहीत असा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

आभासी वर्गासाठी एक लाख भाडे आकारण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाने अद्याप काही ठरविले नसून त्याबाबत. धोरणात्मक निर्णय घेऊन परिपत्रक काढण्यात येईल. तसेच त्याबाबत वृत्तवाहिनीवर माहिती देणा-या विभाग प्रमुखांवर व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४ च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे अशी माहिती कुलसचिवांनी दिली.

लोकसभा निवडणुकांमुळे जाहिर करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या काळात विद्यापीठाने अर्थसंकल्प अधिसभेपुढे सादर करावा किंवा नाही याबाबत शासनदरबारी प्रशासनाने लेखी चौकशी केली असता विद्यापीठाला अर्थसंकल्प अधिसभेपुढे सादर करण्याची परवानगी देण्यात आल्याबद्दलची माहिती कुलसचिवांनी सभागृहास स्थगनप्रस्ताव सुरू करण्यापुर्वी दिली. तसेच सभागृहाने जास्तीत जास्त वेळ अर्थसंकल्पावर चर्चा करावी. एकसारखे असलेले स्थगन प्रस्ताव एकत्रित मांडावेत अशी विनंती सन्माननीय सभासदांना केली.

प्रश्नोत्तराच्या तासासाठी घातलेल्या वेळेच्या मयदिमुळे उपस्थित विद्यार्थी प्रतिनिधींना त्यांची बाजू मांडता आलेली नाही. त्यामुळे त्यांना आपले प्रश्न

मांडण्याची संधी दयावी अशी विनंती सन्मानीय सदस्य श्री. गणेश चव्हाण यांनी अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने कुमारी रेश्मा पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासासाठी विचारलेल्या प्रश्नास देण्यात आलेली छापील माहिती ही अत्यंत कमी असून मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत जवळपास सातशे महाविद्यालये असून त्यापैकी फक्त ३८ महाविद्यालयात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. इतर महाविद्यालयात मराठी भाषा दिन का केला जात नाही? असा प्रश्न सन्माननीय सदस्या कुमारी रेश्मा पाटील यांनी उपस्थित केला.

मराठी भाषा दिवस किती महाविद्यालयात साजरा करण्यात येतो याबाबत परिपत्रक काढण्यात आले आहे. महाविद्यालयाकडून माहिती येत असून जसजशी माहिती येईल त्याप्रमाणे आपल्याला ती उपलब्ध करून देऊ असा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

प्रश्नोत्तराच्या तासाच्या अनुषंगाने विचारलेला प्रश्न परिनियम २२४(ब) नुसार नाकारण्यात आल्याबद्दल विचारणा करत श्री. पियुष झेंडे यांनी परिनियम २२४(ब) म्हणजे काय? या बाबतची माहिती अध्यक्षांना विचारली.

परिनियम २२४(ब) नुसार कोणते प्रश्न घ्यावेत आणि कोणते घेऊ नये याबाबतचे अधिकार कुलगुरूंना देण्यात आले आहेत. आपल्या प्रश्नाबाबतची माहिती मोठया प्रमाणात व कालोपहरण करणारी होती त्यामुळे आपला प्रश्न परिनियम २२४(ब) (vi) नुसार नाकारण्यात आला असा खुलासा कुलसचिवांनी केला.

मराठी भाषा दिन सर्व महाविद्यालयात का साजरा केला जात नाही. त्याबाबत विद्यापीठाने परिपत्रक काढले का? हा दिन साजरा न करणा-या महाविद्यालयांवर विद्यापीठ कारवाई का करत नाही? विद्यापीठाने अशा महाविद्यालयांवर कारवाई करावी. आदी मुद्दयांवर सभागृहात सखोल चर्चा झाली चर्चेत श्री. सुधाकर तांबोळी, श्री. प्रदीप सावंत, श्री. महादेव जगताप आणि श्री. राजन कोळंबेकर या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

विद्यापीठात कुसुमाग्रजांच्या नावाने एक अध्यासन सुरू करण्याबाबत मागील सभेत मा. कुलगुरूंनी आश्वासन दिल्याची आठवण करून देत, आजपर्यंत विद्यापीठाने त्यासाठी काय कार्यवाही केली याबाबत सभागृहाला माहिती दयावी, अशी मागणी सन्मानीय सदस्य डॉ. वसंत शेकडे यांनी केली.

कुलगुरूंनी नाकारलेल्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा होऊ शकत नाही हे नक्की. परंतु आंम्हाला मराठीचा अभिमान व आदर आहे. तथापी महाविद्यालयांनी मराठी दिन साजरा करण्याबाबत कायदयाच्या चौकटीची पडताळणी करून प्रशासनाने आश्वासन दयावे अशी सूचना सन्मानीय सदस्य प्रा. अंबादास मोहिते यांनी दिली.

मराठी भाषा दिवस साजरा करण्याबाबत शासनाकडून जे परिपत्रक आपल्याकडे आलेले आहे त्याच्या अनुषगांने आपण सर्व महाविद्यालयांना कळविले आहे. एखादया महाविद्यालयाने जर मराठी दिन साजरा केला नाही तर काय कारवाई करावी याबाबत परिपत्रकात काही उल्लेख नाही. शिवाय विद्यापीठ कायदयातही याबाबत काही निर्देश दिलेले नाहीत. ज्यावेळी आपल्याला शासनाकडून निर्देश प्राप्त होतील त्यानुसार कारवाई करण्यात येईल. जर शासनाने सक्तीचे निर्देश दिले तर विद्यापीठही सक्तीचे करील परंतु जास्तीत जास्त महाविद्यालयात मराठी भाषा दिन कसा साजरा करण्यात येईल यासाठी विद्यापीठ नक्कीच प्रयत्न करील अशी माहिती कुलसचिवांनी सभागृहास दिली.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५(५५) नुसार मराठी भाषेचा विकास करणे, प्रचार करणे, मराठीचा मिडीयम ऑफ इन्सट्रक्शन अधिकाधिक कसा उपयोग करता येईल याबद्दलचे पूर्ण अधिकार विद्यापीठाला आहेत. असे सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे यांनी सांगितले.

यानंतर सन्मानीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला, सदर स्थगन प्रस्तावास सन्मानीय सदस्य श्री. गणेश चव्हाण यांनी अनुमोदन दिले.

> **“मुंबई विद्यापीठाच्या ढासळलेल्या आर्थिक कारभाराबाबत. मे २०११ ते सप्टेंबर २०१३ पर्यंत मुंबई विद्यापीठास शासनमान्य पदावर कार्यरत असणा-या शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पगारांसाठी जे अनुदान मिळते ते जर बंद होते तर त्या कालावधीत त्यांचा पगार, टी.ए,डी.ए. इनक्रीमेंट कुठून दिलात; यासाठी अर्धा तास सभा तहकुब करावी अशी आपल्याला विनंती करतो.”**

विद्यापीठातील १३१९ मंजूर पदांचा पगार मे, २०११ ते सप्टेंबर, २०१३ पर्यंत शासनाकडून प्राप्त झालेला नसून तो विद्यापीठाच्या फंडातून देण्यात येत आहे. विद्यापीठाच्या फंडतून दरमहा ४ ते ५ कोटी रूपये शिक्षकेत्तर पदांच्या पगारासाठी खर्च होत आहे. वास्तविक सदरचा पैसा विद्यापीठातील विविध

शैक्षणिक कामासाठी खर्च झाला पाहिजे, विद्यार्थ्यांसाठी ज्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, त्या विद्यापीठाकडून मिळत नाहीत. विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांना पगार तर दिलाच पाहिजे. परंतु शासनाकडून अनुदान बंद का झाले? विद्यापीठातील कर्मचा-यांचे पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाचे स्टॅपिंग का होत नाही? ही एक अत्यंत गंभीर बाब आहे. पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाचे स्टॅपिंग नियमीतपणे केले असते तर विद्यापीठाच्या जनरल फंडावर येणारा बोजा कमी झाला असता. बजेटमध्ये इंडियन सायन्स कॉंग्रेसाठी ५ कोटी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्चसाठी फक्त ५ लाख रुपयांची अत्यल्प तरतूद केली आहे. तसेच इतकी पर्यटन व टुरीझमसाठी देखील अत्यंत कमी तरतूद केली आहे. परीक्षा भवनाच्या इमारतींची व उपहागृहाची परिस्थिती वाईट आहे. मुंबई विद्यापीठाच्या हेल्थ सेंटरमध्ये एक डॉक्टर कायमस्वरूपी असावा, त्यातील लॅबोरटी मध्ये लॅबोरटीयन असावा, ॲब्युलंन्स असावी आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी निगडीत बाबींसाठी आपण पैसा खर्च करायला हवा.

शासन मान्य व शासन अमान्य पदांच्या गोंधळामुळे मागील जवळपास तीन वर्षे शासनाकडून विद्यापीठाला कर्मचा-यांच्या वेतनापोटी फक्त सतरा कोटी रूपये सरकारकडून मिळालेले आहेत आणि जवळपास एकोणपन्नास कोटी रूपये पगारावर खर्च झालेला आहे. सरकारने आपली जबाबदारी संभाळणे जसे अत्यंत आवश्यक आहे तसेच शासनास आवश्यक असणारी शासनमान्य व अमान्य कर्मचा-यांची माहिती विद्यापीठाकडेही उपलब्ध असली पाहिजे अशी सूचना सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे यांनी स्थगन प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होताना केली.

माझ्या माहितीनुसार शासन मान्य व अमान्य असे दोन प्रकारचे कर्मचारी आहेत. १३३९ शासन मान्य पदे असून, २५० शासन अमान्य पदे आहेत! माझ्या मते जनरल फंडातून खर्च करण्यासाठी एफडी तोडावी लागली हे खरे आहे का? एफडी तोडून पगार दयावा लागतो. एफडी तोडायची वेळ येत असेल तर विद्यापीठ कोणत्या आर्थिक स्थितीत आहे. याचा विचार करण्याजोगी गोष्ट आहे. विद्यापीठात हंगामी कर्मचारी आहेत, त्यांना दोन-दोन महिने पगार मिळालेले नाहीत. तसेच सिध्दार्थ महाविद्यालयातील कर्मचा-यांना तीन महिन्यापासून पगार मिळालेला नाही. विद्यापीठ आणि सह संचालक सांगतात आमचीही जबाबदारी नाही. मग नक्की जबाबदारी कोणाची? आदि मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी चर्चे दरम्यान उपस्थित केले.

विद्यापीठाच्या भवितव्याच्या दृष्टीने फायनाशियल मॅनेजमेंट हा विद्यापीठाचा कणा आहे. इकडचा फंड तिकडे वापरायचा, विद्यापीठाच्या

गंगाजळीतून जनरल फंडातून कशासाठी पैसे खर्च करायचे, कुठे भरणा करायचा याचे काहीएक धोरण नाही. येणारे इन्कम आणि होणारा खर्च याच्यामध्ये काही ताळमेळ नाही. दहा हजार फी जमते आणि लाखाची तरतुद बजेटमध्ये करावी लागते. याबाबत विद्यापीठाने गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. सगळयांना विश्वासात घेऊन या गोष्टी केल्या नाहीत तर आगामी काळामध्ये फार मोठया समस्या निर्माण होतील. विद्यापीठातील काही सेल्फ फायनान्सचे कोर्सेस तोटयात चालले आहेत. ते शोधून काढले पाहिजेत. अभियांत्रिकी महाविद्यालये नियमाचे पालन करत नसतील आणि विद्यापीठही त्यांच्यावर काही कार्यवाही करत नसेल तर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ बी कलमाप्रमाणे विद्यापीठाचेच अनुदान रोखण्यात येईल. अशी धोक्याची सूचना सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) गोरक्ष पारगावकर यांनी केली.

पिपल्स एज्युकेशन संस्थेत निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे वेतनाबाबत विद्यापीठाने मध्यस्ती करावी, अशी विनंती सन्मानीय सदस्य डॉ. विजय पवार यांनी या चर्चेत सहभागी होताना केली. पिपल्स एज्युकेशन संस्थेच्या दोन्ही महाविद्यालयातील प्राचार्यांची पदे रिक्त असून वडाळयाच्या महाविद्यालयाची पोलीसात तक्रार करण्यात आलेली आहे याबाबत सभागृहास नेमकी माहिती दयावी अशी विनंती सन्माननीय सदस्य प्राचार्य विठ्ठल रोकडे यांनी केली.

मा. मंत्री श्री. राजेश टोपे यांच्यासोबत घेतलेल्या बैठकीत पिपल्स एज्युकेशन सोसायटीतील प्राचार्य पदाचा वाद लक्षात घेता, चर्चेअंती विद्यापीठाच्या कुलसचिवांच्या मार्फत महाविद्यालयांतील वरीष्ठ शिक्षकांच्या माध्यमातून महाविद्यालयातील कर्मचा-यांचा पगार दयावा असे ठरले असतानाही, उपरोक्त मुद्दा पुन्हा कसा उपस्थित झाला याबाबत सन्माननीय सदस्य श्रीमती (डॉ.) मधू परांजपे यांनी विचारणा केली त्यावर दोन वेगवेगळया प्राध्यापकांकडून प्राचार्य असल्याचा दावा करण्यात येवून कर्मचा-यांच्या पगाराचे बिल सादर केल्यामुळे सदर गोंधळ निर्माण झाला असल्याची माहिती कुलसचिवांनी चर्चेस उत्तर देताना दिले.

त्याचप्रमाणे चर्चेत पुढे सहभागी होताना, विद्यापीठातील शासनमान्य/अमान्य पदांचा मुद्दा विद्यापीठात वर्षानुवर्ष चालु आहे. याबाबत मंत्री महोदयांची भेट घेऊन विद्यापीठाची सविस्तर माहिती सादर केली असता, शासनमान्य पदांची यादी जोपर्यंत विद्यापीठ सादर करत नाही तोपर्यंत ७५ टक्के पगार देण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदयांकडून देण्यात आले असून विद्यापीठाकडून देखील शासनमान्य पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची यादी

लवकरच शासन दरबारी सादर करण्यात येईल, याबाबतचा खुलासा कुलसचिवांनी केला.

ग्रंथालयातील एका कर्मचा-यांची निवृत्ती पर्यंत सेवा कन्फर्म झालेली नाही. याबद्दल विधान व्यक्त करून विद्यापीठातील शासनमान्य पदावरील कर्मचा-यांची/अधिका-यांची शासन अमान्य पदावर बदली करू नये अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी केली.

मुलांचे तसेच मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ४ कोटी रूपये अनुदान प्राप्त झाले असून त्याबाबतची कार्यवाही सुरू करणे. त्याचप्रमाणे विद्यापीठ परिसरात वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी एका डॉक्टरची नियुक्ती व Pathology Laboratory ची सोय लवकरच उपलब्ध करून देणे, Academic Audit बाबत विद्यापीठातील विभाग प्रमुखांना व्यवस्थापन परिषदेच्या समोर विभागाबाबत सादरीकरण करणासाठी पाचारण करणे. विद्यापीठातील उपहारगृहातील सुविधा तसेच सुधारणाबाबत समिती गठीत करण्यात येऊन समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करणे. ग्रंथालयातील कर्मचा-यांच्या गोपनीय अहवाला अभावी त्यांचे रखडलेले कन्फर्मेशन अहवाल प्राप्त होताच करण्यात येईल तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांची २०१३ पुर्वीची प्रकरणे पूर्ण झाली असून २०१३ च्या प्रकरणापैकी २० प्रकरणे वरीष्ठ लेखा अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली असल्याबाबतचा खुलासा कुलसचिवांनी चर्चेस उत्तर देतांना केला.

कुलसचिवांनी दिलेल्या आश्वासनांच्या खुलाश्या अंती सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

सन्मानीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला व त्याला सन्मानीय सदस्य श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले.

> "मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात अतिक्रमण रोखण्यास विद्यापीठ व्यवस्थापन अपयशी ठरल्यामुळे तसेच मुंबई विद्यापीठाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विशेष कक्षाला अंपग केल्याबद्ल तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या भरतीमध्ये झालेल्या गैरप्रकाराबद्ल तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध कामासाठी

नियुक्त केलेले आऊटसोर्सिंग टेक्नलॉजी अपयशी झाल्याबद्ल सभागृह अर्धा तास तहकुब करावे."

मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील कोटयावधी रक्कमेच्या जागेवर झालेले अतिक्रमण, जे.पी. नाईक भवनामागील विद्यापीठाच्या जागेत वाढत्या वस्त्याकडून होणारे अतिक्रमण तसेच हयात हॉटेल, आर्मी हॉस्टेल, पोलिस खात्याला, दिलेली जागा विद्यापीठातील अनेक विभागांना जागा नसताना राजीव गांधी डिपार्टमेंटच्या इमारतीपैकी सकाळ फाऊडेंशनला दिलेली साठ टक्के जागा, फुले, आंबेडकर या महापुरूषांच्या नावाने सुरू असणा-या विभागांना मात्र जागा न देणे, त्याचप्रमाणे विद्यापीठाने विद्यापीठातील स्पेशल सेल हा विभाग अपंग केला आहे. त्यांना कोणत्याही प्रकारचे ट्रेनिंग देण्यात येत नाही, मॉनिटरींग कमिटी नाही. महाविद्यालयांत ॲडमिशन कशा प्रकारे चालतात त्यांचा डेटा विद्यापीठाकडे नाही. किती ॲडमिशन एस.सी. किती एस.टी.ची झाली याचे रेकॉड विद्यापीठाकडे नाही. राजीव गांधी फेलोशिप मागासवर्गीय विद्यार्थ्यापर्यंत पोहचत नाही, विद्यार्थ्यांना रेमेडियल कोचिंग मिळत नाही, रेमेडियल कोचिंगखाली कम्युनिटी मायनॉरीटीसाठी असलेल्या स्किम्स राबविल्या जात नाहीत. विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रक्रिया राबवताना नियमबाहय नियुक्त्या करण्यात आल्या. ब-याच नियुक्त्यांमध्ये पात्रताधारक उमेदवारांना डावलण्यात आले, विद्यापीठातील कामकाज सुलभ व तंत्रशुध्द होण्यासाठी सन २००६ पासून विद्यापीठाने एम.के.सी.एल. ची नियुक्ती केली. सुविधा पुरविण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडून रू. ५०/- घेण्यात येतात. एम.के.सी.एल. ने विद्यार्थ्यांच्या ॲडमिशन पासून ते त्यांचे सर्व शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांचे हॉलतिकीट, ऐनरॉलमेंट, ईलिजीबीटी, पूर्नमुल्यांकन. एस.एम.एस. द्वारे वेळापत्रक पुरवणे आदी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. परंतु एम.के.सी.एल. बाबत विद्यापीठास अत्यंत वाईट अनुभव आलेला आहे. या सर्व बाबीचा विचार गांर्भियाने करणे गरजेचे आहे, आदि मुदद्‌े सन्माननीय सदस्य श्री संजय वैराळ यांनी उपस्थित केले.

स्थगन प्रस्तावावर चर्चा करत असताना, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना होणा-या चर्चेत भाग घेता यावा म्हणून प्रत्येकाने स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने मोजकेच बोलावे, परिनियमातील तरतूदीनुसार १५ मिनिटापेक्षा जास्त बोलता येत नसून अध्याक्षांना देखील वेळ वाढवून देता येत नाही, अशा प्रकाराची माहिती प्रा. अंबादास मोहिते यांनी दिली. पुढे त्यांना जवळपास विद्यापीठाच्या सत्तर हजार स्क्वेअर फुट जागेवर सन २००८ पासून अतिक्रमण झालेले असल्याचे सांगितले. मुंबई सारख्या शहरात विद्यापीठाची जागा फार

महत्वाची असून करोडो रूपयांची जमीन परत घेण्यासाठी विद्यापीठ काही ठोस कार्यवाही करणार आहे का? वेगवेगळया विभागाचा विद्यापीठाला विकास करायचा आहे. अध्यासन असतील तर त्यासाठी जागा लागणार आहे. असे असताना आपण ही जागा अशीच सोडून देणार का? अशी पृच्छा करून प्रा. मोहित्यांनी विद्यापीठाने त्यावर तातडीने ठोस कार्यवाही करावी अशी सूचना केली.

टेनिस कोर्टला दिलेल्या जागेत मुंबई विद्यापीठाच्या एकाही खेळाडूला किंवा शिक्षकाला सरावासाठी प्रवेश दिला जात नाही. विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि पर्यायाने विद्यापीठाला जर त्या कोर्टचा उपयोग होत नसेल तर सदर जागा लवकरात लवकर ताब्यात घ्यावी अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. प्रदिप सावंत यांनी चर्चेत सहभागी होताना केली.

चर्चा पुढे नेत, विद्यापीठात जास्तीत जास्त गोंधळ हा परीक्षा भवनात होतो त्यापुढे तेथे कायम स्वरूपी कर्मचारी असायला पाहिजे. अशी सूचना सन्मानीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी केली.

प्रश्नोत्तराच्या पुस्तकात देण्यात आलेल्या माहितीनुसार विद्यापीठाच्या जवळपास ७०० महाविद्यालयांपैकी फक्त १२ महाविद्यालयांना मान्यताप्राप्त प्राचार्य आहेत. त्यामुळे शिक्षणांचा दर्जा ढासळत चालला आहे. या विषयाकडे विद्यापीठाने गांर्भीयाने पाहिले पाहिजे. त्याचप्रमाणे शिक्षक व प्राचार्य यांची प्रकरणे तीन-चार वर्षे विद्यापीठाकडे मान्यतेसाठी पडून आहेत. प्रोफेसर आणि असिस्टंट प्रोफेसर यांच्या पदोन्नती बाबत नियमांमध्ये, कायदयामध्ये जी गुंतागुंत आहे त्यातून मार्ग काढून त्यांच्या पदोन्नतीची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणे गरजेचे आहे. आदी मुद्दे सन्मानीय सदस्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी उपस्थित केले.

युजीसीच्या आदेशानुसार एस.सी.,एस.टी. स्टॅडींग कमिटीच्या बैठका वर्षातून दोन वेळा होणे आवश्यक आहे. तसेच एस.सी.,एस.टी. स्टॅडींग कमिटीमध्ये किंवा विशेष कक्षात जे निर्णय होतात, ते सगळे निर्णय अतिशय योग्यरीतीने होतात. परंतू निर्णयांची अंमलबजावणी होत नाही, ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे. तसेच एकाच संस्थेची एकापेक्षा जास्त महाविद्यालये असल्यास नियमा नुसार प्राचार्य पदास आरक्षण असले पाहिजे. तथापी विद्याप्रसारक मंडळ, ठाणे, भारतीय विद्याभवन मुंबई, पारले टिळक असोसिएशन, मुंबई, गोखले एज्युकेशन सोसायटी नाशिक आणि शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे, या संस्थांना आपली एकापेक्षा जास्त महाविद्यालये असतानाही प्राचार्यांची पदे कोर्टात जावून बिगर आरक्षित करून घेतली आहे. याबाबत विद्यापीठाने ठोस पाऊले उचलावित असे सन्मानीय सदस्य डॉ. विजय पवार यांनी सुचविले.

वरील चर्चा पुढे नेत सन्मानीय सदस्य प्राचार्य (डॉ.) गोरक्ष पारगांवकर यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१३ च्या परिपत्रकातील आरक्षीत जागांच्या तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

विद्यापीठाच्या कलिना परिसरातील जागा ही मुंबई मधील मोक्याची व बहुमुल्य किंमतीची असल्यामुळे इतर संस्थांसोबत करार करतांना विद्यापीठाने विशेष काळजी घेतली पाहिजे. विद्यापीठाला यापुर्वी देखील अल्केश दिनेश मोदी या संस्थेकडून जागेबाबत वाईट अनुभव आल्यामुळे विद्यापीठाने यातून काहीतरी शिकले पाहिजे. त्याचप्रमाणे राजीव गांधी सेंटर फॉर कंटेम्पररी स्टडीज सोबत झालेल्या कराराच्या माध्यमातून सकाळ फांउडेशनच्या राजीव गांधी सेंटरची जवळपास ६०% टक्के जागा देण्यात आल्याबाबत तसेच विद्यापीठातील ब-याच विभागांना पुरेशी जागा नसल्याबाबत झालेल्या चर्चेत श्री. शंशीकात झोरे, श्रीमती निलिमा भुर्के, प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे, प्रा. अंबादास मोहिते, डॉ. बाळकृष्ण भोसले, प्राचार्य (डॉ.) गोरक्ष पारगांवकर या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

मोठया राजकीय पुढा-यांच्या दबावाखाली सकाळ फाऊंडेशनला दिलेल्या जागेबाबत विद्यापीठ दुर्लक्ष करीत आहे. त्याचप्रमाणे २६/११ नंतर कलिना परिसरातील जागा विद्यापीठाला परत मिळवता आली असती परंतु जाणीवपूर्वक त्यांच्याकडे दुर्लक्ष केले गेले. नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या ज्या वॉर्डमध्ये अतिक्रमणा सारखी गोष्ट घडते त्या वार्ड अधिका-यावर गुन्हा दाखल करता आला असता. परंतु विद्यापीठाने गुन्हा दाखल केला नाही, आदि मुद्दे श्री. शशिकांत झोरे व श्रीमती निलिमा भुर्के या सन्माननीय सदस्यांनी मांडले.

व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद आणि अधिसभा सदस्य या नात्याने विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयांचा आपण सर्व सन्माननीय सदस्य एक भाग असून एखादया चुकीच्या निर्णयाबाबत फक्त प्रशासनाला आरोपीच्या पिंज-यांत उभे करणे योग्य नसल्याचे सन्मानीय सदस्य प्रा. अंबादास मोहिते म्हणाले.

विद्यापीठाच्या पाली विभागास सध्या फक्त दोन खोल्या देण्यात आल्या असून त्यांची पुरेशा जागे अभावी गैरसोय होत असल्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. अभय बांबोले यांनी सांगितले व विभागास पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्याची त्यांनी मागणी केली.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर सेंटर फॉर सोशल जस्टिस, फुले आंबेडकर अध्यासन, पाली विभाग, Information Technology आणि संगणक विभाग यांच्या

जागेचा प्रश्न तसेच त्यांना चांगल्या सुख सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रश्न, सकाळ फाउंडेशनला जागा उपलब्ध करून दिल्याबाबतचा प्रश्न, विद्यापीठातील इतर विभागांनाही मुबलक जागा उपलब्ध करुन देऊन त्यांच्या अडी-अडचणी समजून घेण्याबाबतचा प्रश्न त्याचप्रमाणे, विद्यापीठाचा मागासवर्ग कक्ष सक्षम करून त्यावर करावयाच्या विविध उपाययोजनांचा प्रश्न तसेच एमकेसीएल मुळे विद्यापीठास सोसावी लागणारी बदनामी आदी बाबीत विद्यापीठाने ठोस पाऊले उचलावीत असे विविध मुद्दे सन्माननीय सदस्य श्री संजय वैराळ यांनी सभागृहात लावून धरले.

स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. संजय वैराळ यांनी मांडलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर सोशल जस्टीस व फुले आंबेडकर अध्यासन, पाली इ. विभागांना मुबलक जागा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच इतर विभागातील जागेबाबतच्या अडचणी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सर्व कल्याणकारी योजना व त्यांच्या अडचणीबाबत तसेच अन्य समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून प्रश्न सोडविण्यासाठी प्र-कुलगुरू (निमंत्रक), प्राचार्य डॉ. विष्णु मगरे, प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे आणि श्री. संजय वैराळ यांची समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या माध्यमातून विद्यापीठ श्री. संजय वैराळ यांनी स्थगनप्रस्तावाच्या अनुषंगाने उपस्थित केलेले सर्व मुद्दे सोडविण्याचा प्रयत्न करील असे आश्वासन मा. प्र-कुलगुरु यांनी दिले.

विशेष कक्ष व्यवस्थितरित्या कार्यरत असून डॉ. मगरे यांची विद्यापीठाचे लायझन ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच मागासवर्गीयांच्या तक्रारीचे निरसन करण्यासाठी स्थायी समितीच्या बैठका दि. २४ डिंसेबर, २०१३, दि. ७ जानेवारी २०१४, तसेच स्थायी समितीच्या उपसमितीच्या बैठका दि. ३ ऑक्टोंबर, २०१३, दि. २८ फेब्रुवारी, २५ मार्च २०१४ ला आयोजीत करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालयातील आरक्षण विषयक धोरणाच्या अमलंबजावणी करण्याबाबतची कार्यशाळा दि. २ मार्च, २०१३ रोजी आयोजीत करण्यात आली होती. त्याचप्रमाणे ई-स्कॉलरशिप बाबत मार्गदर्शन करण्यासाठी दि. २९ जुलै, २०१३ रोजी कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. राजीव गांधी नॅशनल फेलोशिप संदर्भात विद्यापीठाच्या विभागाकडून जे अर्ज येतात ते अर्ज पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जातात. ई-स्कॉलरशिप चे प्रपोजल समाजकल्याण विभागाकडे पाठविण्यात आले आहे, ई-स्कॉलरशिप साठी विशेष कक्षाकडे नवीन सेल समाजकल्याण विभागामार्फत सुरू करण्यात येणार आहे. आदी बाबींचा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

डॉ. आंबेडकर सेंटर फॉर सोशल जस्टीजसाठी एक स्वतंत्र इमारत किंवा तीन-चार खोल्याचा संपूर्ण एक मजला उपलब्ध करून देण्यासाठी तसेच डॉ.

आंबेडकर सेंटर फॉर सोशल जस्टीजसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी त्यांनी समन्वयक असताना केलेल्या प्रयत्नाबाबत सन्माननीय सदस्य डॉ. प्रल्हाद जोगदंड यांनी उल्लेख केला परंतू अदयाप अभ्यासक्रम सुरु न झाल्याबाबत खंत व्यक्त केली.

विद्यापीठाचे विशेष कक्ष अतिशय सक्षम करणे गरजेचे आहे. मागासवर्गीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थायी समितीच्या बैठका जास्तीत जास्त झाल्या पाहिजेत व त्यांनी घेतलेल्या निर्णयांची विद्यापीठाने वेळेत अंमलबजावणी केली पाहिजे. विद्यापीठ कायद्याप्रमाणे मागासवर्गीयांच्या हिताचे रक्षण करणे ही विद्यापीठाची जबाबदारीच असून विद्यापीठाने त्यांच्या हिताचे रक्षण करावे. अशी कळकळीची विनंती सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) विष्णू मगरे यांनी केली.

घटक महाविद्यालय या विभागाने CAS बाबत नुकत्याच काढलेल्या परिपत्रकामुळे गोंधळ निर्माण झाला असून त्या संदर्भात खुलासा करावा. सदर परिपत्रकामुळे ब-याच प्राध्यापकाचे दिलेले प्रमोशन रदद् होण्याची भिती प्राध्यापक वर्गात निर्माण झाली असून, याबाबतची गंभीर चिंता सन्माननीय सदस्य डॉ. दिपक बिडवई यांनी व्यक्त केली.

विद्यापीठातील अधिकारी/कर्मचा-यांच्या बदल्याबाबत शासनानुसार धोरण स्विकारण्यात येईल. विद्यापीठाचे निकाल वेळेत लागण्यासाठी आणि परीक्षांच्या आयोजनात तंत्रज्ञानाचा उपयोग सुरू असून परीक्षेच्या कामात त्यामुळे सुलभता येत असल्याचा प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. नवीन तंत्रज्ञान अवलंबताना नक्कीच थोडया अधिक प्रमाणात testing trables असू शकतात. परंतु तंत्रज्ञानामुळे नक्कीच परीक्षेच्या कामाला गती मिळेल. त्याचप्रमाणे परीक्षा भवनातील infratructure development करण्याचे काम सुरू आहे आणि या सर्व बाबी परीक्षेचे कामकाज व निकाल लावण्यासाठी मदत करतील. नवीन तंत्रज्ञानामुळे पेपरफुटीला आळा बसलेला आहे. विद्यापीठाच्या जमिनीवर झालेल्या अतिक्रमाबाबत सदर जागा मिळविण्यासाठी विद्यापीठ पूर्ण प्रयत्न करील. टेनिसकोर्टबाबत व्यवस्थापन परिषदेमध्ये चर्चा झाली असून त्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. ७५/२५ गुणपध्दतीची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन असून लवकरच त्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. ज्युनिअर सुपरवायझर, सिनियर सुपरवायझर आणि चीफ कंडक्टर यांच्या मानधनात योग्य ती वाढ करण्यासाठी विविध प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील असा खुलासा मा. प्र-कुलगुरु यांनी केला.

विद्यापीठाची अतिक्रमण केलेली जागा मिळविण्यासाठी विद्यापीठाने वेळोवेळी प्रयत्न केले असून उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे त्यास स्थगिती देण्यात आली होती. परंतु विद्यापीठाने सदर जागा मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले आहेत. सकाळ फाऊंडेशला जागा दिलेली नसून राजीव गांधी सेंटर सोबत त्यांचा करार झालेला असून सदर कराराच्या माध्यमातून एक रिसर्च लॅब निर्माण करण्यात येत आहे त्या लॅबचा फायदा आपल्या शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना होणार आहे.

मा. प्र-कुलगुरूंच्या आणि कुलसचिवांच्या खुलाशा/आश्वासना नंतर सन्माननीय सदस्य श्री संजय वैराळ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

सन्माननीय सदस्या श्रीमती (डॉ.) मधू परांजपे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे मांडला व त्याला सन्माननीय सदस्य डॉ. वसंत शेकडे यांनी अनुमोदन दिले.

> "That this meeting of the Senate be adjourned for ten minutes to express concern over the widening gap between the expectations and achievements in academic matters and as result of which there is a likelihood of University as well as affiliated colleges missing out on the benefits that could accrue from certain schemes of the MHRD"

सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) मधु परांजपे यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे "राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान (रूसा) या केंद्र सरकार तर्फे २०१३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या योजनेकडे सभागृहाचे लक्ष वेधले व या योजनेचा फायदा घेण्यासाठी विद्यापीठ कितपत तयार आहे असा प्रश्न उपस्थित केला. सन्माननीय सदस्या डॉ.(श्रीमती) मधु परांजपे पुढे म्हणाल्या की, उच्च शिक्षणामधील विद्यार्थ्यांचे नोंदणीचे प्रमाण ३२% पर्यंत वाढविणे, शैक्षणिक श्रेष्ठता, संशोधन, नाविन्यता, समुदायनिष्ठा "Marginalized Community" उच्च शिक्षणाची उपलब्धता वाढविणे ही रूसाची उद्दिष्टे आहेत. मुंबई विद्यापीठात अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविणे आवश्यक आहे. रूसा अंतर्गत निधी मिळण्याकरीता पुढील अटी महत्वाच्या आहेत. १). राज्य सरकारने उच्च शिक्षण परिषद गठीत करावयास हवी. २). राज्य सरकारचा बृहत आराखडा जो विद्यापीठ व पर्यायाने महाविद्यालयांच्या बृहत आराखडयावर आधारीत राहील आणि ३). शिक्षकांची रिक्त पदे युजीसीच्या अटीप्रमाणे भरावयास हवीत. त्या पुढे म्हणाल्या की, मानव संसाधन विकास मंत्रालय व राज्य शासनास शिक्षकांच्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक जागा रिक्त आढळल्यास पुढल्या वर्षीचे अनुदान मिळणार नाही. विद्यापीठाने रूसा अंतर्गत

निधी मिळविण्याकरीता अटींची पूर्तता करण्याचे आव्हान स्विकारावे त्याकरीता कार्यशाळेचे आयोजन करून महाविद्यालयांना बृहत आराखडा तयार करण्यासाठी मदत करावी व शासनासोबत बोलणी करून सर्व हितसंबंधाचा (Stake Holders) चा समावेश असलेल्या कार्यशाळेची निर्मिती करावी. कंत्राटी पद्धतीवर काम करणा-या अर्हताधारक शिक्षकांना नियमित करावे व महाविद्यालयांमधील रिक्त जागांकरीता मुलाखती घेण्याकरीता निश्चित वेळापत्रक तयार करावे. तसेच विद्यापीठ व महाविद्यालयांच्या व्यवस्थापनांनी शिक्षकांना शैक्षणिक अर्हता वाढविण्याकरीता प्रेरित करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कॅसच्या अंमलबजावणीत एकसूत्रता असावी व त्याकरीता विषय तज्ज्ञांना विद्यापीठाने सुस्पष्ट दिशानिर्देश दयावेत जेणेकरून कोणीही पात्र व्यक्ती त्यापासून वंचित राहणार नाही. तसेच साबूसिद्धीकी अभियांत्रिकी महाविद्यालय, मालिनी किशोर व संघवी महाविद्यालयाच्या ज्या प्राध्यापकांची मान्यतेची प्रकरणे ब-याच वर्षापासून प्रलंबित आहेत त्यांना व २००९ पूर्वी एम.फील केलेले आहे तसेच जून २०१३ च्या शासन निर्णयानुसार नेट/सेट मधून सूट प्राप्त शिक्षकांची मान्यतेची प्रकरणे विशिष्ट कालावधीत निकाली काढण्याकरीता विद्यापीठाने आश्वासन दयावे व परीक्षेच्या कामांमुळे शिक्षकांना निवडणूक कामांपासून सूट देण्याची मागणी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) मधू परांजपे यांनी केली.

यावेळी चर्चेत भाग घेताना सन्माननीय सदस्य डॉ. वसंत शेकडे यांनी विद्यापीठात व विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयात शारीरिक शिक्षकांचे पद भरणे सक्तीचे करावे, २००९ पुर्वी एम.फील झालेल्या प्राध्यापकांना मान्यता द्यावी व कर्मचा-यांना त्रास देणा-या पेंढारकर महाविद्यालयाच्या संस्था चालकांवर कार्यवाही करावी अशी मागणी केली.

रूसाबाबत मुंबई विद्यापीठाने नेतृत्व करावे, आराखडा तयार करावा, प्राचार्य, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ आदी सोबत चर्चा करावी जेणेकरून रूसा अंतर्गत विविध बाबींकरीता निधी प्राप्त करता येईल. तसेच एपीआय बाबत मार्गदर्शक तत्वे तयार करावीत असे मत सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे यांनी मांडले.

सन्माननीय सदस्य डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विविध योजनाअंतर्गत असलेली अंदाजपत्रिकेतील तरतुदी पुर्णपणे वापरल्या का जात नाही असा प्रश्न उपस्थित केला.

साबुसिद्धीकी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शिक्षकांच्या मान्यतेबाबत बोलताना सन्माननीय सदस्य डॉ. झहीर काझी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्ती प्रक्रियेचे पूर्ण अधिकार अल्पसंख्यांकांचा दर्जा

असलेल्या संस्थांना आहे. ही बाब सभेपुढे मांडली व विद्यापीठाने एक किंवा दोन आठवडयात या प्रश्नांचे निराकरण करण्याचे आश्वासन द्यावे. तसेच चांगल्या शैक्षणिक सुविधा, चांगले निकाल, चांगले व्यवस्थापन असणा-या महाविद्यालय/संस्थांना विद्यापीठाने प्रोत्साहन द्यावे अशी मागणी केली.

सन्माननीय सदस्या डॉ. मधू परांजपे यांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावांचा 'Excellence' हा केंद्रस्थानचा मुद्दा आहे. 'Excellence' शब्दाची व्याख्या अनेक विद्ववानांनी नाना प्रकारे केली आहे. तथापी भारताच्या धवल क्रांतीच्या जनकाने केलेल्या व्याख्येसारखी सुलभ आणि सुबोध व्याख्या अजून माझ्या ऐकिवात नाही. डॉ. कुरीयन यांच्या म्हणण्याप्रमाणे 'Avoiding Doing' wrong things म्हणजे Excellence. बिनचूकपणे केलेली कोणतीही गोष्ट म्हणजे 'उत्कृष्टता'. हे सूत्र ज्या विद्यापीठात आपण ज्ञानदानाच काम करतो, त्यालाही लागू पडत. शिकवण्यासाठी पुरेशा शिक्षकांचा अभाव असण अथवा वर्गात शिक्षक आहेत पण विद्यार्थ्यांची वाणवा आहे अशा परिस्थीतीत 'उत्कृष्टतेचे' ध्येय साधण अवघड आहे. उत्कृष्ट विभागांच्या निर्मितीसाठी उत्कृष्ट शिक्षक पुरवणे ही आपली जबाबदारी आहे. शिक्षणापासून 'दिन-दलितांना' वंचित ठेऊन आपल्याला उत्कृष्टतेचा दावा करता येणार नाही आणि म्हणून 'Inclusive Policy' च्या माध्यमातून अभावग्रस्तांच्या समावेशाच धोरण 'रुसा' मध्ये राबवण्यात आल आहे, त्याच मला कौतूक वाटत! 'रुसा' च्या जडण घडणीत डॉ. नरेंद्र जाधव, नियोजन आयोग सदस्य, या महाराष्ट्रीयांचा सिंहाचा वाटा आहे याचा आम्हांला अभिमान वाटतो. शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यापीठ हि सर्वज्ञ असणारी अधिकारी संस्था आहे, त्यासाठी शासनान त्यांना आर्थिक मदत करावी. पण त्यांनी काय कराव आणि काय करु नये हे सांगू नये असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ सुधारणा कायद्यावर बोलताना म्हणाले होते. त्यांचे हे म्हणणे आजही किती प्रत्ययकारी/साक्षात्कारी आहे त्याचा अनुभव शिक्षकांच्या सेवानिवृत्तीच्या नियत वयोमानात वाढ करण्यासाठी बोलावलेल्या बैठकी निमित्त आले. बैठक विद्यापीठात पार पडली. विवाद्य मुद्दा शिक्षकाने एखाद्या ग्रंथात आपला संशोधनपर लेख प्रसिध्द केल्यास त्याचा दर्जा 'संशोधन लेखांचा' की एखाद्या पुस्तकातील प्रकरणाचा? शासकीय प्रतिनिधीच्या मते सदर लेख म्हणजे 'एखाद प्रकरण' आणि त्यातही संपादित पुस्तक असेल तर त्याचा दर्जा नगण्य! खरं तर हा संबंधित शिक्षकाचा लेख निर्विवादपणे संशोधनपरलेखाचा होता. विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारी आणि तज्ञ संस्था म्हणून शासकीय प्रतिनिधीकडे हया लेखाबद्दलच परखड मत नोंदवून

आपल शैक्षणिक क्षेत्रातल नेतृत्व सिध्द करावयास पाहिजे होत, पण तस झाल नाही. हे माझ म्हणण, महोदय, आपणास पटल पण आपण ते व्यक्त करु शकला नाहीत. अशा अंतर्विरोधान आणि संदिग्धतेन आपली व्यवस्था भारलेली आहे. त्यामुळे विद्यापीठ म्हणून घ्याव्या लागणा–या ठाम भूमिकेच दर्शन होत नाही. वरील गोष्टींचा अनुभव विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून आम्हांला पदोपदी येतो, याला 'कॅस' निवडसमितीवरील, शिक्षक निवडसमितीवरील आपचं प्रतिनिधीत्व ही अपवाद नाही. प्रत्येक ठिकाणी आम्हाला दुय्यम भुमिका पार पाडावी लागते. प्राचार्यांच्या नियुक्तीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने API (Academic Performance Indicators) साठी जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत, ती सापेक्ष आहेत. त्यामुळे विद्यापीठाची एखादी समिती गठीत करुन API संदर्भातील आपल्या परिस्थितीशी सुसंगत अशी नियमावली तयार होणे आवश्यक होते. त्यातुन आपल्याला संबंधितांची नेमकी गुणवत्ता हेरुन त्यांना पदोन्नती? अथवा सरळ सेवा भरतीचा लाभ सुलभपणे देता आला असता त्यामुळे महोदय, आम्हास आभासी आश्वासनापेक्षा ठोस आणि कृतिप्रवण आश्वासने देऊन उपकृत करावे. अशी विनंती सन्माननीय सदस्य प्राचार्य (डॉ.) विष्णू मगरे यांनी केली.

विद्यापीठाने परीक्षेबाबत नव्याने अवलंबिलेल्या स्कॅनिंग पद्धतीमुळे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे निकाल उशीरा लागले त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण व नोक–यांसाठी मुकावे लागते. याबाबींकडे विद्यापीठाने गांर्भियाने लक्ष द्यावे अशी सूचना सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुमार यांनी केली.

विद्यापीठाने तयारी करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. व त्याकरिता विद्यापीठाच्या स्वॉट एनालिसीस (SWOT Analysis) चे अवलोकन करुन त्याप्रमाणे बलस्थाने वाढविणे व दूर करणे याबाबत विद्यापीठ कितपत गंभीर आहे अशी विचारणा केली. त्यांनी विद्यापीठाच्या अनेक विभागात विद्यार्थ्यांची कमी पटनोंदणी, वसतीगृहाची अपुरी व्यवस्था, शैक्षणिक वातावरण, रोजगारभिमुख अभ्यासक्रम आदी मुद्दे उपस्थित केले. त्यांनी अल्केश दिनेश मोदी इन्स्टीटयूट ऑफ फायनान्शीयल अ‍ॅण्ड मॅनेजमेंन्ट स्टडीज या विभागाच्या संचालकांची हुकुमशाही पध्दतीची कार्यप्रणाली, या विभागातील मोठया संख्येतील रिक्त पदे, संचालकाद्वारा चालविण्यात येणा–या तीन दिवसीय मॅनेजमेंन्ट डेव्हलपमेंट प्रोग्राम व त्याकरिता आकारण्यात येणारी फी इत्यादीबाबींकडे सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार यांनी सभेचे लक्ष वेधले. एम.डी.पी. सारख्या कोर्ससला जर मान्यता दिली तर या संस्था शैक्षणिक संस्था न राहता प्रशिक्षण

संस्था बनतील अशी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल यांनी चिंता व्यक्त केली.

विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाला प्रभावित करावे जेणेकरुन रुसाच्या माध्यमातून भरपूर निधी मिळू शकेल व विद्यापीठाचे श्रेष्ठत्व टिकण्यास मदत होईल याबाबतची सूचना सन्माननीय सदस्या प्राचार्या (श्रीमती) कमला बालसुब्रमण्यम यांनी केली.

विना अनुदानित अभ्यासक्रम चालविणारी महाविद्यालये विद्यापीठाच्या परिपत्रका प्रमाणे अंमलबजावणी करीत नाहीत व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचा-यांना कमी वेतन देतात याकडे विद्यापीठाने लक्ष दयावे अशी सन्माननीय सदस्य डॉ. विजय पवार यांनी मागणी केली. कॅसबाबत विद्यापीठाने वर्कशॉप घ्यावे, जव्हार, वाडा, मोखाडा येथील विद्यार्थ्यांनीसाठी कल्याण उपकेंद्रात मुलींचे वसतीगृह बांधावे, पीएचडी गाईडशिप संदर्भातील नियमांबाबत विसंगती नसावी आदी मुद्दे सन्मानीय सदस्या डॉ. माधवी निकम यांनी उपस्थित केले. नवीन तुकडया, विषय आणि महाविद्यालयांना मान्यता मिळवताना संस्थाचालक शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्त करण्याबाबत विद्यापीठ व शासनाच्या सर्व अटी मान्य असल्याचे हमी पत्र देतात पण नंतर अटी, शर्ती धाब्यावर बसवतात अशा महाविद्यालयांवर विद्यापीठाचा अंकुश असावा तसेच पेंढारकर महाविद्यालयावर असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करावी अशी सूचना सन्मानीय सदस्य श्री. दिलीप पवार यांनी केली. तसेच चर्चेदरम्यान पेंढारकर कॉलेजच्या तक्रारीबाबत चौकशीकरीता सहा सदस्यांची समिती गठीत करण्याची सूचना सन्माननीय सदस्य श्री. गणेश चव्हाण, श्री. सुधाकर तांबोळी, श्री. प्रदीप सावंत, डॉ.(श्रीमती) मधू परांजपे यांनी केली.

श्रेष्ठत्वा संदर्भात नुसती चर्चा करुन होणार नाही तर त्याकरीता आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दयायला हव्यात तसेच कोणत्या जर्नल्स मध्ये संशोधन लेख प्रसिध्द करावे यांचे प्राध्यपकांना स्वातंत्र असले पाहिजे अशी सूचना सन्माननीय सदस्य डॉ. बाळकृष्ण भोसले यांनी केली.

विद्यापीठातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील प्राध्यपकांच्या कॅस/पदोन्नती संदर्भात विद्यापीठाने तात्काळ समिती नियुक्ती करुन चौकशी करावी अशी मागणी सन्माननीय सदस्य डॉ. अभय बांबोले यांनी केली.

आपल्या विद्यापीठाचे डिपार्टमेन्ट ऑफ फिजीकल एज्युकेशन, लाईफ लॉग लर्नींग ॲण्ड कंटीन्युइंग एज्युकेशन, स्टुडंट वेलफेअर, एन.सी.सी. व एन.एस.

एस. हे विभाग फार मोठे योगदान देत आहे. त्यामुळे अविष्कार, युवा महोत्सव, क्रिडा महोत्सव आदी मध्ये विद्यार्थी भाग घेतात व पदके मिळवून विद्यापीठाचे नांव उंचावतात. स्टुडंट वेलफेअर मार्फत एससी, एसटी, एनटी, ओबीसी, मायनॉरिटीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण व इतर उपक्रमाबाबत कोटयावधी रुपये दिले जातात, १७ - १८ हजार विद्यार्थी Curriculas, Extra Curriculars व Extra Activities मध्ये भाग घेत आहेत. विद्यापीठात ब-याच चांगल्या गोष्टी होत आहेत. विद्यापीठ प्रशासनाला क्रिटीसाईज करणे हाच फक्त एक्सलन्स अपग्रेड करण्याचा मार्ग नव्हे तर ब-याच चांगल्या गोष्टी आहेत, चांगले शिक्षक आहेत, चांगले प्रशासन आहे या सर्व गोष्टींची क्षमता सुध्दा लक्षात घ्यावी. अशी सूचना सन्माननीय सदस्य प्राचार्य सिध्देश्वर गडदे यांनी केली.

पी.एच.डी ची मौखीक परीक्षा (Viva) ही खुल्या (Open) पध्दतीची असावी, थेट परीक्षेकरिता संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांचा सहभाग घ्यावा तसेच इंटरनल रेफरीला स्वत:च्या गाडीचे/टॅक्सीचे भाडे मिळावे अशी सूचना डॉ. अदयाप्रसाद पांडे यांनी केली.

देशाची प्रगती होण्यासाठी, जागतीकरणासाठी, स्वदेश टिकून राहण्यासाठी नागरीकांना दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तत्रं शिक्षणाचा दर्जा उचावणे, गुणवत्ता वाढवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदी नुसार राज्यातील शिक्षणाचा दर्जा उचांवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासंदर्भात सर्व जबाबदारी विद्यापीठाची असते. शासन परिपत्रकानुसार अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षकांची पदे भरली जात नसल्यास अशा महाविद्यालयांवर विद्यापीठाने कार्यवाही करावी अन्यथा शासन विद्यापीठावर कार्यवाही करेल अशाप्रकारचे आदेश असून विद्यापीठ अशा महाविद्यालयांवर कार्यवाही का करत नाही? पीएच.डी गाईडने किती विद्यार्थी घ्यावेत, तसेच पीएच.डी विद्यार्थ्यांकडून किती फी स्विकारावी याबाबत महाविद्यालयात असलेली भिन्नता तसेच पेट परीक्षा वर्षातून दोनदा होतात. परंतु परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना तीन-तीन वर्ष प्रवेश मिळत नाहीत, त्याचप्रमाणे मिळालेल्या गुणांच्या आधारे प्रवेश देण्यात येत नाहीत. याबाबत नियमावली तयार करण्यात यावी, आदी मुदद् सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांनी मांडले.

पीएचडी गाईडस्ची यादी अद्ययावत करावी, हॉल तिकिट परीक्षेपुर्वी निर्धारीत वेळेत विद्यार्थ्यांना मिळावे, पेट परीक्षा नियमितपणे घ्याव्यात आदी मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी चर्चेदरम्यान उपस्थित केले.

विद्यापीठातील चार विभागानी चांगले संशोधन कार्य केल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शाबासकी मिळाली हा देखील एक्सलन्सचा एक भाग असल्याचे मत सन्माननीय सदस्य डॉ. प्रल्हाद जोगदंड यांनी व्यक्त केले.

प्रश्नोत्तराच्या छापील पुस्तकात अर्धवट व अपूर्ण माहिती दिली जावू नये, महिला कर्मचा-यांना त्रास देणा-या महाविद्यालयांवर महिला कक्षाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे तातडीने कारवाई करावी, विद्यार्थ्यांचे निकाल वेळेवर लागावे आदी बाबी सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत यांनी उपस्थित केल्या.

विद्यापीठाच्या अल्केश दिनेश मोदी संस्थेमध्ये एक ॲडवायजरी कमिटी असावी, अशी सूचना करून सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद यांनी केली विद्यापीठातील ६१ पैकी फक्त ४ विभागांनीच विद्यार्थ्यांना विशेष सहाय्य उपलब्ध करून दिले असेल तर विद्यापीठाला एक्सलन्सकडे कसे नेणार असा प्रश्न उपस्थित केला.

मागासवर्गीय शिक्षक, अधिकारी व विद्यार्थ्यांना विद्यापीठात न्याय मिळावा याकरीता सक्षम यंत्रणा असावी, पीएचडी मार्गदर्शकाकडील विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करावी, अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॅस चा गोंधळ दूर करावा आदी मुद्द सन्मानीय सदस्य डॉ. जालिंदर अडसूळे यांनी मांडले.

विद्यापीठातील महिला सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे लवकरात लवकर भरावी अशी सूचना सन्मानीय सदस्या कुमारी रेश्मा पाटील यांनी केली.

तासगावकर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट या अभियांत्रिकी महाविद्यालयातील चार शिक्षकेत्तर कर्मचा-यांना कामावरून काढून टाकण्यात आले या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीची बैठक बोलावून त्यांना न्याय द्यावा तसेच एम. जी. एम. महाविद्यालयाचे व्यवस्थापन व्यवस्थित नसून महाविद्यालयात विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबद्दल या महाविद्यालयावर चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. प्रदीप सावंत यांनी केली.

सन्मानीय सदस्या डॉ.(श्रीमती) मधू परांजपे यांनी कॅस संदर्भात एकसुत्रीपणा आणण्याकरीता कॅम्प आयोजित करण्याची व त्यांचे वेळापत्रक तयार करण्याची मागणी केली.

मा. प्र-कुलगुरूंनी स्थगन प्रस्तावावरील चर्चेत सहभागी झाल्याबद्दल व उपयुक्त सूचना केल्याबद्दल सदस्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या सूचनांबाबत आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. तसेच विद्यापीठाची प्रतिमा अधिक उंचावण्याकरीता प्रयत्न करण्यात येतील असे सांगितले. विभागाला इंटरनल कॉलेटी ॲश्युरन्स सेल असावा व त्या माध्यामातून गुणवत्ता उंचावण्याकरीता सातत्याने प्रयत्न केले जावे अशा देण्यात आलेल्या सूचनांचा नक्कीच विचार केला जाईल. विद्यार्थी हा सर्वात महत्वाचा घटक असल्यामुळे विद्यार्थी हितावर अधिकाधीक लक्ष केंद्रीत करण्यात येईल. रूसा करीता कार्यशाळेचे आयोजन केले जाईल. तसेच टाक्स फोर्सचे सुद्दा गठन करण्यात येईल व या माध्यमातून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांकरीता जास्तीत जास्त निधी आणण्याकरीता प्रयत्न केले जातील. शैक्षणिक प्रगतीकरीता जे जे करणे गरजेचे आहे ते सर्व केले जाईल. तसेच शिक्षक मान्यतेची प्रकरणे लवकरच निकाली काढली जातील. निवडणूकीच्या कामामुळे परीक्षेच्या कामावर परिणाम होतो त्यामुळे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांना निवडणूकींची कामे देऊ नये अशी विनंती निवडणूक आयोगाला पत्र लिहून करण्यात येईल, महाविद्यालयांनी संचालक, शारीरिक शिक्षण या पदाची नियुक्ती करावी याबाबत लवकरच परिपत्रक पाठविले जाईल, पेंढारकर महाविद्यालयाच्या चौकशी समितीवर प्राचार्य (डॉ.)विष्णू मगरे, प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे, प्राचार्य (डॉ.) विजय जोशी, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. विवेक देशमुख व श्री. प्रदीप सावंत यांचे नामनिर्देशन करण्यात आले. तर यादवराव तासगाव महाविद्यालयाच्या चौकशी समितीवर प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव पाटील, डॉ. वसंत शेकडे, श्री. सुधाकर तांबोळी, प्राचार्य दिलीप बोरसे यांची समिती गठीत करण्यात आली. कलिना कॅम्पसमध्ये ११ कोटी रूपये खर्चून नवीन अद्यावत ग्रंथालय इमारत उभी राहणार आहे. उत्तम कामगिरी करण्या-या महाविद्यालयांना प्रोत्साहीत केले जाईल. पीएच.डी गाईडशीपबाबत तसेच पीएच.डी केंद्रावर आकारण्यात येणा-या वेगवेगळया फी बाबत तसेच पीएचडी गाईडस्‌कडे किती विद्यार्थी संख्या असावी याबाबत डॉ. (श्रीमती) माधूरी पेजावर, डॉ. प्रल्हाद जोगदंड, डॉ. सुरेश उकरंडे, डॉ. टी.पी. मधू नायर, प्राचार्य (डॉ.)विष्णू मगरे, डॉ. वसंत शेकडे, डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार, डॉ. कर्णिक, (रसायनशास्त्र विभाग) गाईड, डॉ. (श्रीमती) तत्पती मुखोपाध्याय, डॉ.(श्रीमती) शेफाली पंडया, प्रा. साठे, (रूईया महाविद्यालय), श्री. महादेव जगताप, डॉ. विवेक देशमुख आणि श्रीमती निलिमा भुर्के यांची रिव्हयु समिती गठीत करण्यात आली. अल्केश दिनेश मोदी संस्थेतील उपस्थित केलल्या एम.डी.पी. व इतर बाबी विषयी लक्ष देवून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. नवीन ग्रुप इन्शुरन्स स्कीममध्ये विद्यापीठाच्या कर्मचा-यांचा समावेश करण्यात येईल. बाबु जगजीवनराम छात्रावास योजनेअंतर्गत ठाणे येथे मुली व मुलांकरीता वसतिगृह बांधण्याचे नियोजन

असल्याची माहिती प्र-कुलगुरूंनी दिली. इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या कॅस संदर्भात लक्ष देण्याची विनंती तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातांना करण्यात येईल, मा. प्र-कुलगुरूंनी स्टुडन्ट वेलफेअर, लाईफ लॉग लर्नींग, फिजिकल एज्युकेशन आदी विभागांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल अभिनंदन केले. शिक्षक व प्रशासनातील आपण सर्वांनी विद्यार्थी व विद्यापीठ हिताकरीता मिळून काम करण्याचे आव्हानही केले. कॅस करीता निवडणूकांच्या तारखा लक्षात घेवून १६,१७,१८ एप्रिल, २०१४ रोजी कॅम्प आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

सन्माननीय सदस्या डॉ.(श्रीमती) मधू परांजपे यांनी काही महाविद्यालयातील शिक्षकांना सिलेक्शन ग्रेड देण्यात आली तर काही कॉलेजेसमधील शिक्षकांना ती नाकारण्यात आली असे का? असा प्रश्न उपस्थित केला असता कुलसचिवांनी मंत्री महोदया सोबतच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा नमुना दिला व शासन निर्णय होईपर्यंत या प्रक्रियेत थांबविण्याची शासनाची सूचना असल्याचे स्पष्ट केले.

सन्माननीय सदस्य श्री. प्रदीप सावंत आणि श्रीमती निलिमा भुर्के यांनी वेळे अभावी त्यांचे स्थगन प्रस्ताव एकत्रीत पुढीलप्रमाणे मांडले.

श्रीमती निलिमा भुर्के:- **"मुंबई विद्यापीठातील परीक्षा भवन इमारत व त्यातील विभाग हयामुळे होत असणारी विद्यार्थ्यांची असुविधा हयाबाबत मागील सभेत स्थगन प्रस्ताव देण्यात आला होता. पुढील वर्षी नवीन इमारत व व्यवस्थापनात सुधारणा होईल अशा आश्वासनावर अंमलबजावणी करण्यात आली नाही. सभागृह अर्धातास तहकुब करावे."**

श्री. प्रदीप सावंत :- **"मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागात जे गोंधळ चालले आहेत त्याबद्दल श्वेतपत्रिका काढण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते परंतु अद्याप पर्यंत तसे न करण्यात आल्याने सभागृह अर्धा तास तहकुब करण्यात यावे."**

परीक्षा विभाग, आयडॉल, संलग्नता व मान्यता विभाग अशा जवळ-जवळ विद्यापीठातील सर्व विभागाच्या कार्यप्रणालीमध्ये गोंधळ चालला असून श्वेतपत्रिकेबाबत काय झाले असा प्रश्न श्री. प्रदीप सावंत यांनी उपस्थित केला. अधिसभेतील रिक्त असलेल्या व झालेल्या पदांवर नामनिर्देशन करण्यात विद्यापीठाकडून होत असलेली दिरंगाई, प्राध्यापक हातेकर यांच्याबाबत घेतलेल्या

चुकीच्या निर्णयामुळे विद्यापीठाची झालेली बदनामी, डोनेशन घेऊन भरल्या जाणा-या मायनॉरेटी महाविद्यालयातील रिक्त जागा विद्यापीठाने भराव्यात, त्याचप्रमाणे विद्यार्थी तक्रारार निवारण समितीच्या बैठकीस परीक्षा नियंत्रकाची नेहमीच असलेली गैरहजेरीबाबत. आदी मुद्दे पोटतिडकीने सन्माननीय सदस्य श्री. प्रदीप सावंत यांनी मांडले.

विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात येणारे आश्वासने परंतु त्याची वेळेत पुरतता होत नाही, परीक्षा भवनातील गोंधळ, त्यामुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास, विद्यापीठाला घडयाळाची दुरूस्ती, नवीन बागा या पेक्षाही परीक्षा विभागातील मुद्दे महत्वाचे नाहीत का? आदी मुद्दे सन्माननीय सदस्या श्रीमती निलिमा भुर्के यांनी पोटतिडकीने मांडले.

स्थगन प्रस्तावास अनुसरून श्री. सुधाकर तांबोळी यांनी श्वेतपत्रिकेबाबत काय झाले असे पुन्हा एकदा विचारणा केली. त्याचप्रमाणे परीक्षा भवनातील इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये सुधारणा, अधिसभेतील, रिक्त जागा भरण्याबाबत, विद्यापीठाच्या जागेत होत असलेल्या अतिक्रमनाबाबत करावयाच्या उपाययोजनांचा विद्यापीठाने लवकरात लवकर विचार करावा.

अल्केश दिनेश मोदीच्या नाणीशास्त्र विभागामध्ये देणगीच्या स्वरूपात देण्यात आलेल्या नाण्यांच्या २ फेब्रुवारी रोजी होत असलेला लिलाव आम्ही हाणून पाडल्याचे सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर तांबोळी यांनी सभागृहाला सांगितले.

अपु-या मनुष्यबळा अभावी परीक्षा भवनातील कर्मचारी वर्ग तणावाखाली वावरत आहे. विद्यार्थी संख्येत आणि महाविद्यालयात होत असलेल्या वाढीच्या पटीत कर्मचारी वर्गात सुध्दा वाढ झाली पाहिजे, विद्यापीठातील भरतीप्रक्रियेमध्ये वेटींग लिस्ट मधील उमेद्‌वारांना देखील संधी दयावी. आदी मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत झोरे यांनी मांडले.

वर्क आणि एज्युकेशन ऑडीट विद्यापीठाने करणे अत्यंत गरजेचे आहे, नॅक कमिटीचा रिपोर्ट अद्याप वेबसाईटवर टाकलेला नाही, वर्षातून दोन वेळा पेट ची परीक्षा घेणे गरजेचे आहे, पीएच.डी गाईड अभावी लोक राजस्थान येथील विद्यापीठात रजिस्ट्रेशन करत असल्याबाबतची खंत व्यक्त करत विद्यार्थ्यांचे बेसिक प्रश्न विद्यार्थ्यांच्या अडचणी त्यांच्या मुलभूत गरजा पूरवणे हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे. परीक्षेचे निकाल वेळेत लागले पाहिजे तसेच हॉस्टेलच्या व्यवस्था अद्ययावत करणे आदी मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांनी मांडले.

शारीरिक शिक्षण विभागात महिला ऐवजी पुरूषांच्या सुरक्षेचा प्रश्न निमार्ण झाला असल्याची चिंता सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) शेफाली पंडया यांनी व्यक्त केली.

बायोमॅट्रिक हे सर्वांना बंधनकारक आहे, ॲकॅडमिक ऑडीटचा मुद्दा म्हणून विभागप्रमुखांना व्यवस्थापन परिषदे पुढे विभागाची माहिती सादरीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. वर्क ऑडीटबाबत समिती गठीत करण्यात आली असून अहवालानुसार कार्यवाही करण्यात येईल. अधिसभेवरील रिक्त जागा स्थायी समितीची बैठक दिनांक २ फेब्रुवारी, २०१४ रोजी बोलविण्यात आली होती. परंतु काही कारणांमुळे सभा तहकुब करण्यात आली. परंतु अध्यक्षांनी नवीन तारीख सुचविल्यास स्थायी समितीची बैठक घेऊन अधिसभेवरील रिक्त जागांचा प्रश्न सोडविण्यात येईल. प्राध्यापक हातेकर यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सभागृहात चर्चा करणे योग्य नाही. मायनॉरीटी महाविद्यालयातील रिक्त जागा भरताना ॲडमिशन मॉनेटरींग कमिटीला आणखीन सक्षमपणे काम करण्याचे आदेश देण्यात येतील. विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या बैठकीस परीक्षा नियंत्रक किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहील. त्याचप्रमाणे लिगल ॲडवायझर देखील उपस्थित राहतील. इत्यादी मुद्दयांचा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी केला.

**बाब क्र ३ : २०१४-२०१५ या वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचा अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-२०१४ वर्षाकरिता सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज.**

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार विद्यापीठाचा सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पीय अंदाज सादर केला. त्यास प्राचार्य विष्णू मगरे यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठाने कॅश पद्धती ऐवजी मरकनटाईल पद्धती का अवलंबलेली आहे? गर्व्हमेंट सेक्टरमध्ये, राज्य शासनामध्ये आणि महानगरपालिकेमध्ये या सर्व ठिकाणी मरकनटाईल पद्धत अवलंबली जाते. सस्पेंस अकाऊंटमध्ये ठेवलेली जास्तीची रक्कम, सध्याच्या ऑडीटरचा कमी असलेला अनुभव, एका ऑडीटरने काम पूर्ण होत नसल्यास आणखी एक ऑडीटर नेमण्याचा सल्ला त्याचप्रमाणे सिंधू स्वाध्यायासाठी ५० लाख रूपयांची तरतूद केली असून सिंधू स्वाध्याचा विद्यार्थ्यांना, शिक्षकांना किंवा विद्यापीठाला कितपत फायदा होईल आदी मुद्दे सन्माननीय सदस्य डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा यांनी उपस्थित केले.

मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीत असलेल्या जिल्हयांना मोठा समुद्र किनारा लाभला असून नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ ओशनोग्राफीच्या लेवलचे हे सिंधू स्वाध्याय असणार आहे. अभ्यासक्रमात पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमचा समावेश करण्यात येणार आहे. सदर उपक्रमास राज्य शासनाकडून तत्वता मान्यता मिळाली आहे. त्याचप्रमाणे आपण इतर केलेल्या सूचनाबाबत विद्यापीठ विचार करील असा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

यानंतर मा. प्र-कुलगुरूंनी पुढील सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पीय अंदाजावरील दुरूस्ती सूचना वेळे अभावी एकत्रित मांडण्याची विनंती केली. डॉ. दिपक बिडवई यांना दुरूस्ती सूचना मांडण्याची विनंती केली.

सन्माननीय सदस्य डॉ. दिपक बिडवई यांनी त्यांची दुरूस्ती सुचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

सन्मानीय सदस्य डॉ. दिपक बिडवई यांनी कै. दिलीप करंडे यांनी विद्यापीठाच्या कामकाजात गेली तीस वर्ष मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना मरणोत्तर पीएच.डी बहाल करावी असा प्रस्ताव मांडला त्यास श्री. महादेव जगताप यांनी अनुमोदन दिले. त्याचप्रमाणे विद्यापीठातील कामकाजात मंडणगड महाविद्यालयाचा मोठा सिंहाचा वाटा असून कर्मवीर दादासाहेब इदाते अधिसभा सदस्य, प्राचार्य सांगळे विद्धत परिषदेचे सदस्य, डॉ. दिपक बिडवई, अधिसभा सदस्य आणि डॉ. सुभाष सावंत बोर्ड ऑफ स्टडीजचे इत्यादी सदस्यांचा विद्यापीठाने पुढाकार घेऊन राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्याचा प्रस्ताव देखील मांडला. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवायचे असतील तर विद्यापीठ चोवीस तास सुरू ठेवावे, विद्यापीठाची व्याप्ती लक्षात घेता मंडणगड येथे उपकेंद्र सुरू करावे आदी मुद्दे सन्माननीय सदस्य डॉ. दिपक बिडवई यांनी सभागृहात मांडले.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

अर्थसंकल्पामध्ये रेम्युनरेशनसाठी तरतूद केलेली आहे. परंतु वर्षानुवर्ष शिक्षकांना त्यांचे रेम्युनरेशन वेळेत मिळत नाही. कोर्सवर्कसाठी पी.जी च्या सेक्शनमध्ये प्रोविजन केलेली दिसत नाही. शिक्षक स्वतःच्या पदरचे पैसे घालून गेस्ट स्पिकरसाठी मानधन गोळा करत आहे. कोर्सवर्क तसेच परीक्षा घ्यायच्या आहेत. तर त्यासाठी तरतूद देखील करणे गरजेचे आहे. फेलोशिपसाठी केलेल्या तरतूदीचा वापर केला जात नाही फॉरेन लॅग्वेजसाठी रू.२५,०००/- केलेली

तरतूद कमी असून त्यात वाढ करण्यात यावी. आदी दुरूस्ती सुचना सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार यांनी मांडल्या.

फेलोशिप विद्यार्थ्यांपर्यंत व शिक्षकांपर्यंत का पोहचत नाही. विद्यापीठातील विभागांनी अदयाप कोर्सवर्क सूरू केले नसून ते लवकर सुरू करण्याबाबतचे मुद्दे सन्माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम व डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल यांनी मांडले.

फेलोशिप संदर्भात बाराव्या प्लानमध्ये विद्यापीठाला यु जी सी कडुन १० कोटीचे वेगळे ॲलोकेशन झालेले आहे. १० कोटीचे ॲलोकेशन झाल्यामुळे इकडे फेलोशिप कमी झाल्यासारखे दिसते आहे. असा खुलासा प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी केला.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. जालिंदर अडसुळे यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

सन्माननीय सदस्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी ठाणे जिल्हयात एससी/एसटी विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे परवडत नसून ठाणे जिल्हयात एससी/एसटी विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे. ही एक चिंतेची बाब असून विद्यापीठाने स्कॉलरशिपमध्ये केलेली तरतूद ही देखील कमी आहे. त्यात वाढ करावी. विद्यापीठाचे स्पेशल सेल सक्षम करावे, विद्यापीठातील एससी/एसटी विद्यार्थ्यांची कमी होत चाललेली संख्या, भारत सरकार राज्य सरकार कडून मिळणारी स्कॉलरशीप व त्यात विद्यापीठाने किती भर घालावी याबाबत विद्यापीठाने बजेटमध्ये तरतूद करावी आदी मुद्दे मांडले.

रेफरी आणि गाईडच्या मानधनाबाबत समितीचा अहवाल प्राप्त होताच त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. फेलोशिप विद्यापीठातील विभागात देण्यात येत असल्याचा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

पीएच.डी सेंटरमध्ये प्रवेश देण्याबाबत असलेली भिन्नता त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणा-या फी च्या तुलनेत लेक्चरसाठी येणारा खर्च लक्षात घेता महाविद्यालयाने कोर्सवर्क कसे मॅनेज करावे याबाबत खुलासा करण्याची विनंती सन्मानीय सदस्य डॉ. आदयाप्रसाद पांडे यांनी केली.

पीएच.डी अभ्यासक्रम आणि कोर्सवर्क हया दोन्ही वेगवेगळया गोष्टी असून पीएच.डी कोर्सवर्क नियमावली युजीसी प्रमाणे असल्याचा खुलासा सन्मानीय सदस्य डॉ. मधू नायर यांनी केला.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. राजन कोळंबेकर यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

परीक्षा विभागातील हंगामी कर्मचा-यांवर ३.७० कोटी रूपये खर्च होत आहे. परीक्षा विभागात हंगामी कर्मचा-यां ऐवजी कायमस्वरूपी कर्मचा-यांची नियुक्ती करावी परीक्षा विभागाच्या दुरूस्तीसाठी करण्यात आलेल्या ४५ लाख रूपयांच्या तरतूदीत वाढ करण्यात यावी. त्याचप्रमाणे फोटो कॉपी मिळेपर्यंत फेरतपासणीची तारीख संपलेली असते. फोटोकॉपी मिळाल्यानंतर फेरतपासणीची तारीख निश्चित करावी. आयडॉलच्या विभागात ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया पुन्हा सुरू करावी. ऑफलाईनमुळे विद्यापीठाला पैसा मिळणार आहे. त्याचप्रमाणे आयडॉयल बजेटमध्ये पोस्टाचा खर्च दाखविण्यात आला आहे. परंतु विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे टपाल पोस्टाने मिळत नाही. त्यांना स्वत: आयडॉलमध्ये येऊन घ्यावे लागते. क्रिकेटच्या संघास देण्यात येणा-या मानधनात वाढ करण्यात यावी, विद्यार्थी प्रतिनिधींना निवडून आल्यानंतर खूप कमी अवधी मिळतो. त्यांना चांगल्या उपक्रमात सहभागी करून घ्यावे. आदी मुद्दयां बाबत झालेल्या चर्चेत श्री. संजय वैराळ, श्री. शशिकांत झोरे या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

आयडॉलमधील ऑनलाईन प्रक्रिया सुरू राहणार असून ऑफलाईन बाबत ॲडवाईजरी कमिटीपुढे बाब ठेऊन निर्णय घेण्यात येईल. परीक्षा विभागातील हंगामी कर्मचारी कमी करणे व कायमस्वरूपी कर्मचारी बदली करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल असा खुलासा मा. प्र-कुलगुरुंनी केला.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती निलीमा भुर्के यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

सन्माननीय सदस्या श्रीमती निलीमा भुर्के यांच्या दुरुस्ती सूचनेला सन्माननीय सदस्य श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले. यांनी त्यांची दुरुस्ती सूचना मांडताना महिला विकास कक्ष समकक्ष करणे गरजेचे आहे तसेच शिबिरे, चर्चासत्र, नियतकालीके या माध्यमातून महिलांमध्ये जागृकता आणणे गरजेचे आहे, परंतु यासाठी बजेटमध्ये केलेली तरतूद अतिशय कमी असून त्यात वाढ करावी. वसतिगृहात इलेक्ट्रीसीटी, वायफाय कनेक्शन, बेडस, सिक्युरिटी आणि मेडीकल सोयी उपलब्ध्न करून देताना बजेटमध्ये वाढ करावी असे मुद्दे मांडले.

नवीन वसतिगृहाची निर्मिती करण्यात येत असून वसतिगृहात टी.व्ही टेबलटेनिस आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असा खुलासा मा. प्र-कुलगुरूंनी केला.

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या स्कॉलरशिपमध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. राजन कोळंबेकर यांनी केली असता वाढ करण्यात येईल असा खुलासा कुलसचिवांनी केला.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

चार वर्षात चार परीक्षा नियंत्रक व चार कुलसचिव बदलणे ही एक गंभीर बाब असून परीक्षा विभागातील निकाल वेळेत लावण्याबाबत विद्यापीठाने गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे अल्केश दिनेश मोदी संस्थेतील कोर्स फी चा विद्यापीठाचा हिस्सा विद्यापीठास प्राप्त होत नाही. तसेच तेथील पदे रिक्त असतानाही ती भरली का जात नाहीत? त्याचप्रमाणे तेथील अभ्यागत प्राध्यापकांवर कमी खर्च होत असून बजेटमध्ये जास्त तरतूद केली आहे. मराठी भाषादिन विद्यापीठाने अजून चांगल्या त-हेने साजरा केला पाहिजे, त्याचप्रमाणे शासनाने मराठी भाषा दिवसासाठी १५ कोटींची तरतूद केलेली आहे. त्याचा विद्यापीठ काही फायदा घेणार आहे का? सोमय्या महाविद्यालयातील प्राचार्यांकडून मराठी विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी केलेला विरोध, बजाज संस्थेतील प्राध्यापकांची रिक्त पदे, जमनालाल बजाज संस्थेच्या बजेटमध्ये ट्रेनिंग स्टुडन्ट ॲक्टीवीटी फिल्डसाठी, व्हिझिटिंग फॅक्लटीसाठी, ट्रेनिंग प्रोजेक्ट इत्यादी साठी केलेली तरतूद जास्त असून वास्तविक खर्च मात्र कमी होत आहे. ठाणे उपकेंद्रात सुरू होणा-या नविन कोर्ससाठी बजेटमध्ये तरतूद केलेली दिसत नाही. कल्याण येथे सुरू होणा-या स्कुल ऑफ इंजिनिअरींग हे आयआयटी दर्जाचे असावे त्या अनुषंगाने बजेटमध्ये तरतुद करावी.

परीक्षेचे निकाल विद्यापीठाने नव्याने सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन असेसमेंट, ऑनलाईन स्कॅनिंगमध्ये नक्कीच उशीर झाला असावा परंतू निकाल वेळेत लावण्यासाठीच्या सर्व उपाय योजना करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करीत आहे. पुढील निकाल नक्कीच वेळेत लागतील. अल्केश दिनेश मोदी बाबत समिती स्थापन करण्यात आली आहे. ठाणे व कल्याण उपकेंद्र हे आयआयटी प्रमाणे करण्यासाठी कमिटीला सूचना देण्यात येतील व त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविला जाईल. मराठी भाषेत पीएच.डी बाबत विद्यापीठाच्या नियमानुसार निर्णय घेण्यात येईल. मराठी भाषादिन किती महाविद्यालयात साजरा करण्यात

आला याबाबत विद्यापीठ नक्कीच आढावा घेईल अशा प्रकारचा खुलासा मा. प्र-कुलगुरुंनी केला.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. विजय पवार यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

साठे महाविद्यालयाच्या प्राचार्या कविता रेगे यांच्या प्राचार्य पदाची नियुक्ती चुकीची असून चुकीच्या व्यक्तीच्या नियुक्तीमुळे साठे महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांवर अन्याय होत आहे. जवळपास १६ प्रकरणे विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाकडे प्राप्त झालेली आहे, हि एक गंभीर बाब असून प्राचार्य कविता रेगे यांच्या नियुक्तीबाबत चौकशीची मागणी सन्माननीय सदस्य डॉ. विजय पवार यांनी केली.

सदर चर्चे दरम्यान झालेल्या चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ व डॉ. अभय बांबोले यांनी सहभाग घेतला.

साठे महाविद्यालयाबाबत विभागाकडून व महाविद्यालयाकडून माहिती घेऊन एका महिन्यात निर्णय घेण्यात येईल असा खुलासा मा. प्र-कुलगुरुंनी केला.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. विवेक देशमुख यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

टेकनॉलॉजीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारी फी जवळपास ८.३ करोड इतकी असून रेमुनरेशनसाठी फक्त रू. ७२ लाख खर्च होत आहे, त्यामुळे विद्यापीठाने शिल्लक राहणा-या रक्कमेतून एकतर विद्यार्थ्यांची फी कमी घ्यावी किंवा रेमूनरेशनचे मानधन वाढवावे, त्याचप्रमाणे एक्झाम रिफोर्मसाठी ८.९६ लाख वरून १.३६ करोड अशी मोठया प्रमाणात केलेली तरतूद याबाबत खुलासा करावा. तसेच परीक्षा ऑनलाईन होत असेल तर फी मधील २५ टक्के रक्कम महाविद्यालयांना मिळायला हवी. कारण परीक्षेचा जवळपास सर्व खर्च महाविद्यालयांना करावा लागत आहे. फर्निचर आणि फिक्चरसाठी मागील वर्षी केलेल्या तरतूदींचा वापर केला गेला नाही. विद्यापीठातील उपकुलसचिवांच्या कार्यालयात गेले असता बरेच महत्वाचे कागदपत्र अस्त व्यस्त पडलेले असतात.

दत्ता मेघे महाविद्यालयाने महानगरपालिकेकडून ओसी न घेता महाविद्यालय सुरू केले आहे. महाविद्यालयात एखादी घटना घडल्यास विद्यापीठाची नाचक्की होईल असा प्रश्न सन्मानीय सदस्या डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत

यांनी उपस्थित केला असता विद्यापीठ तपास करुन योग्य ती कार्यवाही करेन असे आश्वासन मा. प्र–कुलगुरूंनी दिले.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय वैराळ यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर युपीसी सेंटरसाठी केलेल्या तरतुदीमध्ये वाढ करावी, विद्यापीठाच्या फोनवर एकंदरीत होणारा खर्च आटोक्यात आणणे गरजेचे आहे, इलेक्ट्रीसिटीवर होणारा खर्च रोखण्यासाठी सोलर सिस्टीम सुरू करावी, ट्रेनिंगसाठी केलेल्या तरतूदीत वाढ करून कर्मचा–यांना ट्रेनिंगची सुविधा उपलब्ध करून दयावी, स्टडी टुर साठी केलेल्या तरतूदींचा वापर व्हावा, बुक बँकेची सुविधा इंजिनिअरींग आणि एमएमएस महाविद्यालयांपर्यंत पोहचत नाही, त्याच्याप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सुविधाचे परिपत्रक देखील सदर महाविद्यालयांपर्यंत पोहचत नाही, फायनांशिअल असिस्टंट हे जास्तीत जास्त महाविद्यालयांकडे तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे पोहचले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल ॲन्ड जस्टीज विभागात बी.ए. आणि एम.ए. सुरू करण्याबाबत विद्यापीठाने गांर्भियाने विचार करावा, फुले आंबेडकर विभागास बसण्याच्या सुविधा तसेच इतर सुविधा उपलब्ध करून दयाव्यात, त्याचप्रमाणे पाली, बुद्धीज स्टडीजला देखील सुविधा सुखसोयी उपलब्ध करून दयाव्यात, मुंबई विद्यापीठाच्या रेडीओ सेंटरची फ्रिकवेन्सीत वाढ करण्यात यावी, जेणे करून सर्व महाविद्यालयापर्यंत विद्यापीठाला पोहचता येईल. विद्यापीठाच्या ग्रथालयाची अवस्था दयनीय आहे तेथे कधीही अपघात होऊ शकतो. स्पोर्टससाठी पैसे विद्यार्थ्यांकडून घेता परंतु त्याबद्दल आपण त्यांना तुटपुंज्या सुविधा देखील पुरवित नाहीत, आदी मुद्दे सन्माननीय सदस्य श्री संजय वैराळ यांनी पोटतिडकीने मांडले.

टेलिफोन बिल, सोलर स्टिम याबात विद्यापीठ नक्कीच विचार करेल बुक बॅक, रेमेडिअल कोचिंग जास्तीत जास्त महाविद्यालयांपर्यंत, मागासवर्गीय विद्यार्थ्यापर्यंतं पोहचविण्यासाठी विद्यापीठ नक्कीच प्रयत्न करेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर हे सर्व सुविधांसह मोठे करण्यासाठी तसेच आपण केलेल्या सर्व मुद्दयांबाबत विद्यापीठ नक्कीच विचार करणार असा मा. प्र–कुलगुरूंनी खुलासा केला.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. अभय बांबोले यांना त्यांच्या दुरूस्ती सूचनांच्या अनुषंगाने पुढील मुद्दे उपस्थित केले.

मी मांडलेल्या दुरूस्ती सूचनांबाबत माझा असा समज आहे की, ज्या हेडखाली बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. परंतू एकही खर्च झालेला नाही. असे हेड पुढील वर्षी खर्च करण्याऐवजी बजेटमधून वगळण्यात येतात तसेच विद्यापीठाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, Financial Assistance Fellowships Scholarship याबाबत केलेल्या तरतुदीचा पुरेसा वापर केला जाईल याकडे विद्यापीठाने जातीने लक्ष घालावे.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर आपण सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला व आपण केलेल्या अतिमहत्वाच्या सूचनांचा विद्यापीठ नक्कीच विचार करील असे आश्वासन मा. प्र-कुलगुरूंनी दिले.

**४. मे. शरद एस्. गायकवाड आणि कं., मुंबई विद्यापीठाचे सांविधिक लेखा परिक्षक यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०११-२०१२चे वार्षिक लेखे, ३१ मार्च, २०१२ चे ताळेबंद व त्यावरील लेखापरिक्षण अहवाल अधिसभेच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर.**

मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी, मुंबई विद्यापीठाचे सांविधिक लेखा परिक्षक यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०११-२०१२चे वार्षिक लेखे, ३१ मार्च, २०१२ चे ताळेबंद, लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील व्यवस्थापन परिषदेने दिलेली स्पष्टीकरणे.

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार खालील प्रस्ताव अधिसभेच्या विचारार्थ व स्विकृतीसाठी मांडण्याची पूर्वसुचना दिली आहे.

(१) "महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २६ (२) अन्वये विद्यापीठाचा सन २०११-२०१२ चे वार्षिक लेख आणि ३१ मार्च, २०१२ चा ताळेबंद अधिसभेच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहे"

(२) "मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी, सांविधिक लेखा परिक्षक यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेख्यासंबंधीचा लेखा परिक्षित अहवाल," त्यात उपस्थित केलेल्या मुद्दयांना व्यवस्थापन परिषदेने दिलेली स्पष्टीकरणे."

(३) " सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेख्यांमध्ये " 'परिशिष्ठ १' पृष्ठ क्र. ३८८ ते ३९३ व 'परिशिष्ठ २' पृष्ठ क्र. ३९४ मध्ये दर्शविलेल्या सुधारीत अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चाला मान्यता."

(टिप: वित्त व लेखा समितीच्या दि.११ फेब्रुवारी, २०१४ (बाब क्र.१६) रोजी संपन्न झालेल्या सभेत विद्यापीठाचा सन २०११-२०१२ चे वार्षिक लेखे आणि ३१ मार्च, २०१२ चा ताळेबंद व मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी, सांविधिक लेखा परिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल व त्यात उपस्थित केलेल्या मुददयांना वित्त व लेखा समितीने दिलेल्या स्पष्टीकरणांसह मंजूर करण्याची व अधिसभेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. व्यवस्थापन परिषदेच्या दि. १८ फेब्रुवारी, २०१४ (बाब क्र. १२) रोजी झालेल्या सभेत वित्त व लेखा समितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. विद्यापीठाचा सन २०११-२०१२ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च, २०१२ चे ताळेबंद व मे. शरद एस्. गायकवाड आणि कं.यांचा तद्संबंधीचा लेखा परिक्षण अहवाल त्यात उपस्थित केलेल्या मुद्दयांना व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या स्पष्टीकरणांसह अधिसभेपुढे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.)

मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी, यांनी सादर केलेले मंबई विद्यापीठाचे सन २०११-२०१२ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च, २०१२ चे ताळेबंद व लेखापरिक्षण अहवालावरील व्यवस्थापन परिषदेने दिलेली स्पष्टीकरणे व सन २०११-२०१२ या वर्षांच्या वार्षिक लेख्यांमध्ये " 'परिशिष्ठ १' पृष्ठ क्र.३८८ ते ३९३ अं 'परिशिष्ठ २' पृष्ठ क्र.३९४ मध्ये दर्शविलेल्या सुधारीत अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चाला मान्यतेसाठी अधिसभेच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

या विषयावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी दुरूस्ती सूचना मांडली नसल्याने सदर बाबींवर चर्चा करून मान्य करावी अशी विनंती मा. प्र-कुलगुरूंनी केली.

यानंतर प्र-कुलगुरूंनी घोषीत केले की, मे. शरद एस. गायकवाड आणि कं., मुंबई विद्यापीठाचे सांविधिक लेखा परिक्षक यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०११-२०१२ चे वार्षिक लेखे व ३१ मार्च, २०१२ चे ताळेबंद आणि त्यावरील लेखापरीक्षण अहवाल मंजूर करण्यात आले.

५. **महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या विद्यापीठाच्या २०१२-२०१३च्या वर्षवृत्ताला मान्यता देण्याविषयीचा प्रस्ताव.**

व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नुसार प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी पुढील ठरावाची सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले विद्यापीठाचे २०१२-२०१३ चे वर्षवृत्त कालावधी : ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ अधिसभेने मान्य करावे.

टीप : महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) खालीलप्रमाणे आहे.

कलम १०४:-"विद्यापीठाचे वार्षिक अहवाल विद्यापीठाकडून तयार करण्यात येतील आणि प्रसिद्ध करण्यात येतील व व्यवस्थापन परिषदेद्वारे मान्य करण्यात आलेले असे अहवाल, कुलपती, राज्य शासन व अधिसभा यांना सादर करण्यात येतील. अधिसभेस, तिच्या बैठकीत वार्षिक अहवालावर विचार करता येईल व तिला योग्य वाटतील अशा शिफारशी करता येतील. व्यवस्थापन परिषद, अधिसभेच्या शिफारशींवर योग्य ती कार्यवाही करील व केलेली कार्यवाहीही अधिसभेला कळवील".

कलम १०४(२) :- "(२) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेला विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहा समोर मांडण्याची व्यवस्था करील."

या संदर्भात असे नमुद करण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ वर्षवृत्त २०१२-२०१३ तयार करण्यासाठी प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची बैठक दिनांक २१ जानेवारी २०१४ रोजी झाली. समितीने व्यवस्थापन परिषदेला अशी शिफारस केली की, सोबत जोडलेला विद्यापीठाच्या २०१२-२०१३ च्या वर्षवृत्ताचा मसुदा व्यवस्थापन परिषदेला विचारार्थ सादर करण्यात यावा.

व्यवस्थापन परिषदेच्या दि. १८/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेत बाब क्र. २६ हा मसूदा मान्य करण्यात येऊन तो अंतिम मंजूरीसाठी अधिसभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरविण्यात आले. त्यानुसार २०१२-२०१३ चे वर्षवृत्त अधिसभेला मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

त्यानंतर कुलसचिवांनी घोषित केले की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम १०४ व सुधारित कलम १०४(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या विद्यापीठाच्या २०११-२०१२ चे वर्षवृत्त अधिसभेचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

सन्माननीय अधिसभा सदस्या, डॉ. श्रीमती मधू परांजपे यांच्या दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत असल्याने तसेच अधिसभा सदस्या म्हणून त्यांची आज शेवटची बैठक असल्यामुळे त्यांना निरोप समारंभाचे भाषण देताना सदस्यांनी पुढीलप्रमाणे भावना व्यक्त केल्या. मनुष्य एखादया निष्ठेने आपले जिवन कसे जगू शकतो याचे जिवंत उदाहरण म्हणजे डॉ. श्रीमती मधू परांजपे. ज्या एका विचार प्रणालीवरती त्या निष्ठा ठेवतात, नुसती निष्ठा ठेवत नाही तर त्याप्रामणे वागतात, त्यांच्याबाबत बोलताना त्या निष्ठावंत, विचारवंत, अभ्यासू, विषय मांडण्याची कला, एखादया विषयावर मुद्देसूद बोलणे, त्याचबरोबर जहाल व परिपक्व व्यक्तीमत्व म्हणून उच्चशिक्षण क्षेत्रात त्यांचा ठसा उमटलेला दिसतो. तसेच शिक्षक, विद्यार्थी, विद्यापीठ यांच्या हितासाठी असलेली त्यांची तळमळ व त्याच तळमळीने सभागृहात बोलताना सभागृहाचे मत परिर्वतन करण्याची हातोटी त्यांच्यात आहे. जवळपास गेली २५ वर्षे अशा व्यक्तीमत्वाकडून प्रेरीत होऊन त्यांच्याकडून बरेच काही शिकल्याचे तसेच त्यांच्यासोबत चळवळीत सहभागी झाल्याचा अनुभव निरोप समारंभ दरम्यान प्राचार्य डॉ. विष्णू मगरे, प्राचार्य डॉ. मुरलीधर कु-हाडे, प्राध्यापक प्रल्हाद जोगदंड, प्राचार्या डॉ. श्रीमती माधूरी पेजावर, प्राचार्य डॉ. सिध्देश्वर गडदे, प्राचार्य डॉ. गोरक्ष पारगांवकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, प्राध्यापक बाळकृष्ण भोसले, डॉ. विजय पवार, डॉ. आदया प्रसाद पांडे, डॉ. जालिंदर अडसूळे, श्री. महादेव जगताप, श्री. संजय वैराळ, श्रीमती. निलिमा भुर्के, श्री. शशिकांत झोरे, प्राचार्य डॉ. राजपाल हांडे आणि मा. प्र-कुलगुरु यांनी त्यांच्याबद्दलची आपली मते व्यक्त केली.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई - ४०० ०३२,<br>२५ सप्टेंबर, २०१४.

कुलसचिव<br>(मुंबई विद्यापीठ)